कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ।।

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
रामचंद्र मुटाटकर

हाकारा
(त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
ग. शां. पंडित

वर्ष : ३१ वे **ऑक्टोबर - डिसेंबर २०१०** **अंक : चौथा**

अनुक्रमणिका

संपादकीय -- २

१) साहित्य आणि संस्कृती -- ३

२) सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ---------------- ७

३) महाराष्ट्राचे शिल्पकार (प्रकाशित) ---------------------------------- १४

४) मंडळाने प्रकाशित केलेली १०० महत्त्वाची पुस्तके ---------------------- १५

५) नियतकालिकांना अनुदानाचा आधार ----------------------------- १९

६) आदिवासी संस्कृती जागतिकीकरणाच्या विळख्यात : प्रा. डॉ. सुनील पं. उगले ---- २२

७) महाराष्ट्रातील परधान आदिवासी जमातीचा एक अभ्यास : पाटील धनाजी दत्तात्रय ---- २७

८) आदिवासी एक निसर्गमय मानव : डॉ. मोतीराम रावजी देशमुख -------------- ३१

९) आदिवासींचे कैवारी - खंडेराव सावे : डॉ. जयंतराव पाटील ---------------- ३५

१०) जंगलजिव्हारच्या निमित्ताने... ! : श्री पीतांबर कोडापे ------------------ ३८

११) लेखणीच्या तलवारी : डॉ. प्रतिभा वाघमारे ------------------------ ४६

◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
दूरध्वनी : (०२०)२५८९७२९८

अंक मूल्य ४०/- रूपये

◆ **अक्षर जुळणी**
नंदू हि. दिघे

◆ **मुद्रण स्थळ**
ओम एंटरप्राईजेस, पुणे

◆ **संपादक सहाय्य**
सुशिल कहात

◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **मुखपृष्ठ**
'आदिवासी उत्थान कार्यक्रर्मा'च्या संग्रहातून व मंडळाच्या पुस्तकावरुन

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

या अंकाच्या प्रकाशनासाठी **भारतीय सामाजिक अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र** यांचेकडून अनुदान मिळाले आहे.



संपादकीय

"hmH$mam"Mmhm"_hmami´>amÁ`gm{hË` Am{UgßH¥$Vr_§S>imMm gwdU©_hmoËgdr AßH$' Amnë`m hmVr XoVmZm AÊ`mZ§X hmoV Amho. "gm{hË` gßH¥$Vr_§S>i' hr Ho$di emgH$s` gßWm qH$dm `§ÌUm Zìho, Va Vr EH$ "gm§ñH¥${VH$ Midi' åhUmdr bmJob. ñdV§Ì _hmami´>mMo n{hbo _w»`_§Ìr _m. lr. `ed§Vamd Mìhm U `m§Zr _§S>imÀ`m CX²KmQ>ZmÀ`m dobir Ho$boë`m ^mfUmV EHo${R>H$mUr åhQ>bo Amho H$s, ""g_mO {Od§V amhÊ`mgmR>r Ë`mÀ`m Odi Agboë`m ^m¡{VH$ gm_J«`mZo Zìho, Va Ë`mÀ`m Odi Agboë`m gm§ñH¥${VH$ _yë`m§da Am{U {dMmYZmda'' Am{UË`m§Mo ho {dYmZ AmO V§VmoV§V Iao R>abo Amho. H$maU _§S>imZo Ho$di Xp{_©i Jk§Wà H$m{eV Ho$bo, Ago Zmhr, Va Amnbo gm§ñH¥${VH$ {dMmaYZ {Ma§VZ R>odÊ`mÀ`m Ñï>rZo {d{eï> {dî`m§Zmdm{hboë`m {Z`VH$m{dH$m§ZmAZwXmZ XoUo, ZdoIH$m§À`m n{hë`m gm{hË`H¥$Vrg_XVH$aUo, ÉH¥$i> gm{hË` H¥$VtZmnwañH$ma XoUo, Á`oð> gm{hpË`H$m§Zm Jm¡adDÎmr XoUo Aem gdm©Jm§Zr gm{hË` Am{UgßH¥$VrMo OVZ _§S>imZo Ho$bo Amho. åhUyZM _§S>imMo ho H$m`© åhUOo EH$ "gm§ñH¥${VH$ MidiM' Amho, Ago åhUmdm `cBcb.

`m AßH$mV _§S>imÀ`m HmaHsXuMm AmT>mdm Amho M, {edm` Ë`m§À`m H$mhr CHo$_m§Mr _m{hVr XoÊ`mV Ambr Amho. VgoM Am{Xdmgr gm{hË` d gßH¥$VrÀ`m AZwf§JmZo H$mhr boI à{gÜX Ho$bo AmhoV. boIm§_Yrb ({deofV: Am{Xdmgr) {dMmam§da dmM H$m§À`m à{V{H«$`m§Mo ñdmJVM Amho.

gßnmXH$ _§S>i

साहित्य आणि संस्कृती

(महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर १९६० रोजी राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. या मंडळाच्या उद्घाटनाप्रसंगी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी केलेले भाषण.)

आजचा हा औपचारिक समारंभ ही महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर घडणारी एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे असे मी मानतो. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वेळी शासनाच्या धोरणासंबंधीचे मी जे वक्तव्य केले होते, त्यामध्ये साहित्य आणि संस्कृती यांच्या वृद्धी व संवर्धनासाठी एक विद्वज्जनांची यंत्रणा निर्माण करण्याचा सरकारचा हेतु प्रथमच जाहीर करुन महाराष्ट्राशी मी वचनबद्ध झालो होतो. त्याच धोरणाचा पुनरुच्चार महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री. प्रकाशजी यांनी महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या पहिल्या अधिवेशनासमोर केलेल्या आपल्या भाषणात केला. त्यावेळी त्यांनी ज्या शब्दात या धोरणाचा उल्लेख केला होता तो शब्द आपल्यापुढे वाचून दाखविण्याचा मोह मला आवरत नाही. त्यांनी आपल्या भाषणात असे म्हटले होते की, ***''सरकारने मराठी भाषेच्या विकासासाठी आणि समृद्धीसाठी, महाराष्ट्राची भाषा, संस्कृती आणि इतिहास यांच्यासंबंधींच्या संशोधनाकडे तातडीने लक्ष देण्याचे ठरविले आहे. अशा प्रकारच्या संशोधनास उपयुक्त होईल असे साहित्य निरनिराळ्या भारतीय व पाश्चात्य भाषात भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. म्हणून या बाबतीतील संशोधनाचे काम हाती घेण्यासाठी व त्यावर देखरेख ठेवण्यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञांची व विद्वानांची एक उच्चाधिकार यंत्रणा लवकरच निर्माण करण्याचा महाराष्ट्र सरकारचा विचार आहे.''*** या बाबतीत शासनामार्फत वेळोवेळी ज्या घोषणा केल्या गेल्या व त्यांचा जो उच्चार व पुनरुच्चार झाला त्या सर्वांचे मूर्त स्वरुप म्हणजेच आज हे मंडळ स्थापन होत आहे. माझ्या दृष्टीने मी मराठी जनतेला दिलेल्या वचनाची आज परिपूर्ती झाल्याबद्दलचे समाधान माझ्या मनात आहे.

साहित्याच्या प्रश्नांसंबंधी बोलताना माझ्यासारख्या माणसाने थोडेसे जपून बोलावे याची मला जाणीव आहे. तरीही काही गोष्टींचा उल्लेख जर मी इथे केला तर त्याबद्दल आपण मला क्षमा करावी. मी असे मानतो की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आणि भाषिक राज्याच्या निर्मितीनंतर, वैचारिक व सांस्कृतिक पुनरुज्जीवन घडवून आणणारा एक शक्तिशाली नवा प्रवाह भारतीय जीवनात निर्माण झाला असून आपण आता एका समृद्ध अशा कलखंडात प्रवेश करीत आहोत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकजीवन समृद्ध करण्याची जी प्रतिज्ञा आपल्या देशाने केली तिचाच हे पुनरुज्जीवन एक भाग असून भाषिक राज्यांच्या निर्मितीमुळे या पुनरुज्जीवनाच्या कार्यासाठी आम्हाला एक नवे साधन प्राप्त झाले आहे. यापुढे आता एक निश्चित कालखंड सुरु होत असून या क्षेत्रात घेतलेल्या जबाबदाऱ्या आपण पुऱ्या केल्या पाहिजेत. या जबाबदाऱ्या स्पष्ट करुन त्या पार पाडण्यासाठी निश्चित अशी यंत्रणा आपण तयार केली पाहिजे, असे मला वाटू लागले आणि त्यातूनच या मंडळाची कल्पना निर्माण झाली.

साहित्य अकादमी ही अशाच प्रकारची संस्था असून ती १९५४ साली अस्तित्वात आली. वेगवेगळ्या भाषेतील दुर्मिळ ग्रंथ प्रसिद्ध करणे, इतिहासाचे, वाङ्मयाचे आणि निरनिराळ्या संस्कृतीचे संशोधन करणे यासारखे विविध स्वरुपाचे कार्य ही संस्था करीत असते. साहित्य अकादमीसारखेच व शक्य झाल्यास त्यापेक्षाही अधिक व्यापक स्वरुपाचे कार्य या मंडळाकडून व्हावे या उद्देशाने हे मंडळ स्थापन करण्यात आले आहे. या मंडळाला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारखे अध्यक्ष लाभले ही या मंडळाच्या दृष्टीने मोठी भाग्याची गोष्ट असून त्यांच्या एका थोर ग्रंथाला केंद्रीय साहित्य अकादमीने नुकतेच मोठे अनुदान दिले आहे.

या मंडळाच्या निर्मितीसंबंधी जो सरकारी आदेश प्रसिद्ध झाला आहे त्यात या मंडळाच्या कार्याची व्याप्ती स्थूलमानाने दर्शविण्यात आली आहे. परंतु ***या मंडळाने कोठल्या प्रकारचे काम करावे, हे कोणत्या पद्धतीने करावे यासंबंधी कुठलेही बंधन, कुठल्याही मर्यादा शासन या मंडळावर घालू इच्छित नाही.*** सरकारी आदेशातील यासंबंधीचा उल्लेख केवळ नाममात्र आहे. या मंडळावर जी तज्ज्ञ आणि विद्वान मंडळी आहेत त्यांनी या कार्याची सर्व बाजूंनी व्याप्ती वाढावी म्हणून अधिक व्यापक व अधिक सर्वकष असा प्रयत्न केल्यास शासन त्याचे स्वागतच करील हे मी सुरुवातीलाच स्पष्ट करु इच्छितो. या कार्याच्या बाबतीत या मंडळावर किंवा त्याच्या विचारावर सरकार कुठलेही बंधन घालू इच्छित नाही. कारण ***देशातील विचारवंत, कलावंत, लेखक, शास्त्रज्ञ व संशोधक यांच्या प्रयत्नाने निर्माण होणारे विचारधन हेच समाजाचे फार मोठे धन आहे असे मी आणि महाराष्ट्र शासन मानते. ते असले तरच देश ओळखला जातो. समाज ओळखला जातो, समाजाचे जीवन प्रवाही राहते, चिरंतन राहते. समाज जिवंत राहतो तो त्याच्याजवळ असलेल्या भौतिक सामर्थ्याने नव्हे. तर त्याच्याजवळ असलेल्या सांस्कृतिक मूल्यांवर आणि विचारधनावर तो जिवंत राहतो आणि वाढतो असाच इतिहासाचा दाखला आहे.***

आपल्या देशातील परंपरा सुद्धा अशाच तऱ्हेची असून ती सांगावयाची झाल्यास व्यास-वाल्मिकीपासून ते आजपर्यंतच्या अनेक पंडितांची, विचारवंतांची आणि विद्वानांची नावे घ्यावी लागतील. ही यादी मोठी लांबलचक व आकर्षक होईल. पण तिची काही आवश्यकता नाही. थोड्याच दिवसात रवींद्रनाथ टागोर यांच्या जन्मशताब्दीचा समारोह सबंध देशभर आपण साजरा करणार आहोत. व्यास-वाल्मिकींसारख्या महर्षीपासून रवींद्रनाथ टागोरांसारख्या ***ऋषितुल्य*** पुरुषापर्यंत फार मोठी अशी आमची सांस्कृतिक परंपरा आहे. आणि महाराष्ट्रापुरतेच या परंपरेसंबंधी बोलावयाचे झाल्यास ज्ञानेश्वरापासून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्यापर्यंत अनेक नावांचा उल्लेख करावा लागेल. ***अशा या सर्व थोर विद्वानांची, पंडिताची, त्यागी संतांची आणि पराक्रमी पुरुषांची ही आपली अखंड परंपरा आहे. तीच आमची खरी प्रेरणा आहे. त्यांचे कार्य आम्ही पुढे चालविले पाहिजे. त्यासाठी लागणारे साहित्य आणि साधने पुरविणे शासनाचे काम आहे. म्हणूनच शासनामार्फत आज या साहित्यिक आणि सांस्कृतिक मंडळाची निर्मिती होत आहे.***

आजच्या या विशिष्ट परिस्थितीत आपण या

मंडळाची स्थापना करीत आहोत त्याला काही विशेष अर्थ आहे, असे मी मानतो. मराठी भाषा, राज्यभाषा म्हणून स्वीकारण्याची तयारी करण्यासाठी खरोखरी आजचा हा मंगल प्रसंग आहे. ***मराठी भाषा ही राज्यभाषा करण्याचे तत्त्व आम्ही स्वीकारले आहे.*** त्यामुळे आम्ही काही जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत. मराठी भाषेवर लोकशाहीचा कारभार करण्याची आता जबाबदारी आलेली असून ती तिने अशा रीतीने केला पाहिजे की, लोकांचे जीवन संपन्न होण्यास, समृद्ध होण्यास तिचे साहाय्य होईल. त्यासाठी भौतिकदृष्ट्या जगात जे जे शास्त्र उंचावलेले आहे त्या त्या शास्त्रांतील ज्ञान आपल्यात उतरविण्याचे सामर्थ्य मराठी भाषेला प्राप्त झाले पाहिजे. साहित्याचा आणि संस्कृतीचा, विचारवंतांचा आणि लेखकांचा जन्म खरोखरी कशासाठी होत असतो ? मी तर असे मानतो की मनात अनेक मूक आशाआकांक्षा असतात, कल्पना असतात आणि त्या प्रकटीकरणासाठी, व्यक्तिमत्त्वासाठी, एक प्रकारे हाका मारीत असतात. शब्दांसाठी त्या भुकेलेल्या असतात, तहानलेल्या असतात. त्यांच्या हाकेला 'ओ' देऊन लेखक, विचारवंत, संशोधक व शास्त्रज्ञ त्यांना लेखनीद्वारा शब्दरुप देत असतात. ***मराठी भाषिक जनतेच्याही अशा काही आशा-आकांक्षा, इच्छा असून त्या विविधप्रवाही आहेत. त्यांना आपण लेखनीद्वारा शब्दरुप केले पाहिजे. त्याचप्रमाणे ज्ञानाच्या सरोवराचे पाट आपण लोकांच्या जीवनापर्यंत पोहोचविले पाहिजेत. ही ज्ञानगंगा लोकांच्या जीवनापर्यंत पोहोचविण्यासाठी या मंडळाची आम्हास मदत होईल. ते या मंडळाचे काम आहे.***

मराठ्यांचा इतिहास हाही आपला एक मोठा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. इंग्रजांनी त्यांचा जो इतिहास निर्माण केला आहे तो बखरीतून त्यांना सोईस्कर असे ठोकळ स्वरुपाचे उतारे घेऊन निर्माण केला आहे. परंतु मराठ्यांच्या इतिहासाचे पुनरुज्जीवन करण्याची आज आवश्यकता निर्माण झाली आहे. त्याचे नव्याने संशोधन होऊन हा इतिहास पुन्हा लिहिला गेला पाहिजे. ***भारताच्या इतिहासातील मराठ्यांच्या इतिहासाचे पुनरुज्जीवन करण्याचे काम या साहित्य मंडळाचे आहे.***

याबाबतीत विचार करताना अनेक मार्गांनी हा प्रयत्न व्हावयास पाहिजे असे मला वाटते. मराठ्यांच्या इतिहास लेखनासाठी लागणारी अनेक साधने ठिकठिकाणी सर्वत्र विखुरलेली आहेत. ती पश्चिम महाराष्ट्रात आहेत, विदर्भात आहेत आणि मराठवाड्यातही आहेत. परवाच याबाबतीत विद्वान मित्रांशी चर्चा करीत असताना आपल्या विदर्भाचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. माडखोलकर म्हणाले की, विदर्भ आणि मराठवाडा या आदिभूमीशी महाराष्ट्राचा तुटलेला दुवा जोडावयाचा असल्यास, त्यासाठी विदर्भाच्या आणि मराठवाड्याच्या खेड्याखेड्यातून अनेक साधने आहेत. परंतु या प्रश्नाला हात घालून कुणीतरी ही साधनसामग्री एकत्र केल्याशिवाय इतिहासाच्या पुनरुज्जीवनाचे हे काम पुरे होण्याची शक्यता नाही. या बाबतीत अनेक कल्पना, अनेक विचार मनात येऊन जातात. त्यातील मुख्य विचार असा की, हे काम स्थिरपणाने कुठल्या तरी संघटनेने केले पाहिजे. या मंडळानेच हे काम करावे असा मात्र याचा अर्थ नाही. त्याचप्रमाणे या संस्थेच्या अध्यक्षांनी

आणि सदस्यांनी हे काम करावे असाही याचा अर्थ नाही. या मंडळाचे अध्यक्ष माझे मित्र तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आहेत आणि आपल्याकडचे श्री. मिराशी त्यात आहेत. त्यांनी हे सर्व काम करावे असे जर आपण म्हणालो तर तो त्यांच्यावर अन्याय होईल. परंतु हे काम, आपण जी ही यंत्रणा उभी केली आहे तिने, महाराष्ट्रात जी विद्वान मंडळी आहेत त्यांच्याकडून करवून घेतले पाहिजे. या मंडळाने त्यांच्या विचारांचा, त्यांच्या शक्तीचा, साधनांचा उपयोग करुन घेतला पाहिजे. त्यांना कार्यक्षम केले पाहिजे, क्रियाशील केले पाहिजे. ***आपले संबंध व आपल्या कामाचे स्वरुप लक्षात घेऊन आणि या मंडळींच्या ज्ञानाचा, साहित्याचा, विचारांचा उपयोग करुन, काम करण्याची एक प्रवाही योजना या मंडळाने करावी अशी या मंडळाकडून माझी अपेक्षा आहे.***

परंतु या मंडळाचा जन्म निव्वळ इतिहासाचे संशोधन करण्यासाठी झाला आहे असा मात्र याचा अर्थ नव्हे. याबाबतीत परवाच काही मित्रांशी, विचारवंतांशी माझी चर्चा झाली. त्याचप्रमाणे यासंबंधी महाराष्ट्रातील विद्वानांची झालेली चर्चा वृत्तपत्रांतून मी काळजीपूर्वक वाचली, अभ्यासली. मी जेव्हा या मंडळाने इतिहासाचे संशोधन केले पाहिजे असे म्हणतो तेव्हा भूतकाळाचे उत्खनन करुन जेवढी माहिती मिळेल तेवढी त्याने जमा करावी एवढीच त्याची जबाबदारी आहे असा त्याचा अर्थ नसून या संशोधनाबरोबरच त्याने वर्तमानकाळाकडे लक्ष दिले पाहिजे व वर्तमानकाळाकडे बघताना भविष्यकाळाकडे नजर ठेवून त्याने आम्हास मदत केली पाहिजे. मी जेव्हा साहित्य म्हणतो तेव्हा ललित साहित्य म्हणतो असे नव्हे, किंवा ललित साहित्य हेच तेवढे साहित्य असाही त्याचा अर्थ नाही. ललित शब्द म्हणजे साहित्य अशी माझी कल्पना नाही. साहित्य म्हणजे सामान्य जनतेचे ***हित*** करण्याचे साहित्य अशी साधीसुधी व्याख्या मी करतो. ह्या व्याख्येत शास्त्रांचाही अभ्यास गृहीत धरावा लागतो. आज ही गोष्टी कोणीही नाकारु शकणार नाही की, मराठी भाषेमध्ये अमृताशी समान अक्षर लिहिणाऱ्या महान पंडितांना आम्ही शिरोधार्य मानतो असे आम्ही कितीही म्हटले, तरी संशोधनासाठी इंग्रजी भाषेचा पाठपुरावा करणे आम्हाला आवश्यक होते. तेव्हा ***इतर भाषांमध्ये जे ज्ञानभांडार असेल, जे विचार असतील ते मराठी भाषेत खेचून आणण्याचा आम्हाला प्रयत्न करावा लागणार आहे.*** परवाच माझ्या एका संपादक मित्राने ह्या मंडळाला उद्देशून एक सूचना केली की, ***विद्वान मंडळीकडून तयार होणारे ज्ञानकोश, शब्दकोश हे निव्वळ त्यांच्या ग्रंथालयाची शोभा वाढविणारे ग्रंथ न होता, ते जनतेला उपलब्ध होतील अशा स्वरुपाचे झाले पाहिजेत. एवढेच नव्हे तर यासाठी त्यांनी वेगवेगळ्या संस्कृतीचे आणि शास्त्रांचे संशोधन करुन लोकांना उपयुक्त होईल असे मार्गदर्शन केले पाहिजे.*** परंतु हे मंडळ वेगवेगळ्या भाषातील ग्रंथांचे प्रकाशन करणारे प्रकाशन खाते व्हावे असा याचा अर्थ नव्हे. ***तर एक प्रकारचे सर्जनशील आणि विचार करणारे हे मंडळ एक प्रकारचे पॉवर हाऊस बनावे, विद्युतगृह बनावे, अशी माझी या मंडळासंबंधी अपेक्षा आहे.*** ते कुठे तरी क्षितिजापलीकडे राहणारी दुनिया बनता कामा नये. त्याने वाढती क्षितिजे निर्माण केली पाहिजे. एवढेच नव्हे तर ***हे मंडळ महाराष्ट्राचे***

(पान क्र. ४८ वर पहा)

सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

१) मराठी भाषा, साहित्य, संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन आणि संवर्धन करण्यासाठी आणि मराठी भाषेत विविध विषयावरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. यंदा मंडळाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची होती. सर्व देशामध्ये राज्य पातळीवर साहित्य संस्कृतीविषयक हे पहिलेच मंडळ होय.

२) मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते.

३) विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान, समाजविद्या यांच्या कक्षेत येणारे विषय तसेच महाराष्ट्राची भाषा, संस्कृती आणि इतिहास या विषयावर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्यासाठी विविध वाङ्मयीन योजनांना चालना देणे, मदत करणे व अशा योजना मंडळाने स्वत: हाती घेणे हे साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

४) शासनाने मंडळाकडे सोपविलेली वरील उदिष्टे साध्य करण्यासाठी आणि आधुनिक महाराष्ट्राच्या वाङ्मयीन गरजा लक्षात घेऊन सुरुवातीपासूनच मंडळ भौतिक व बहुविध वाङ्मयीन निर्मितीसाठी कार्यरत आहे.

५) ज्ञान आणि संस्कृतीच्या विकासासाठी साधनस्वरुप व आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यातील अद्ययावत प्रगतीची माहिती देणारी, मूलभूत ज्ञान देणारी पुस्तके व अभिजात ग्रंथांची भाषांतरे स्वस्त किंमतीत मराठी वाचकांना उपलब्ध करुन देण्यावर मंडळाने लक्ष केंद्रित केले आहे.

६) त्यासाठी मंडळामार्फत खालील योजना राबविल्या जात आहेत.

मंडळाची पुस्तक प्रकाशन योजना

* शास्त्रीय (विज्ञान) ग्रंथमाला
* उत्कृष्ट ग्रंथांच्या भाषांतराची योजना
* महाराष्ट्राचा इतिहास व महाराष्ट्राच्या इतिहासाशी संबंधित ऐतिहासिक कागदपत्रांचे संपादन, प्रकाशन व संशोधन
* मंडळाची वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक स्वरुपाची अन्य प्रकाशने

या योजनेअंतर्गत आतापर्यंत ४८४ ग्रंथ मंडळाने प्रकाशित केले आहेत. शिवाय ६ पुस्तके मुद्रणासाठी सोपविली आहेत. मंडळाने प्रकाशित केलेल्या ५० पुस्तकांची दुसरी किंवा त्यानंतरच्या आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत.

१) शास्त्रीय (विज्ञान) ग्रंथमाला

या मालिकेतील पुस्तके मराठी वाचकांना स्वस्त किंमतीत उपलब्ध करुन दिली जातात. ही पुस्तके, विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांवरील क्रमिक पुस्तकांना पूरक व संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी होतील.

२) उत्कृष्ट ग्रंथांच्या भाषांतराची योजना

मराठीशिवाय अन्य भाषांमधील विविध विषयांवरील अभिजात वाङ्मयाच्या ग्रंथांनी जगातील वैचारिक साहित्यात मोलाची भर घातली आहे. अशा मौलिक व महत्त्वपूर्व ग्रंथांची भाषांतरे मराठी भाषेत उपलब्ध करुन द्यावी हा या योजनेमागील उद्देश आहे. या योजनेंतर्गत इंग्रजी, रशियन, फ्रेंच इत्यादी पाश्चात्य व संस्कृत, प्राकृत व यासारख्या भारतीय भाषेतील पुस्तके मंडळाने निवडली असून भाषांतरीत पुस्तके मंडळाने प्रकाशित केली आहेत.

३) महाराष्ट्राचा इतिहास व महाराष्ट्राच्या इतिहासावर प्रकाश टाकणाऱ्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या संपादन/प्रकाशनाची योजना

महाराष्ट्राच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी उपलब्ध नवीन साधने आणि साहित्य लक्षात घेऊन आणि अशा अद्यावत साधनसामग्रीचा उपयोग करुन महाराष्ट्राचा प्रमाणभूत असा सुलभ राजकीय, सांस्कृतिक इतिहास मराठी भाषेत नव्याने संपादित/प्रकाशित करण्याची ही योजना आहे. यासाठी आधुनिक इतिहास रचनेच्या तत्त्वांचा उपयोग केला जातो. प्रागैतिहासिक कालापासून ते आधुनिक कालापर्यंत साधारणत: प्रत्येकी ५०० पृष्ठांचे ५ खंड म्हणजेच १) प्राचीन कालखंड २) मध्ययुगीन कालखंड ३) मराठा कालखंड भाग - १, शिवकाल. ४) मराठा कालखंड भाग - २ पेशवेकाल व ५) आधुनिक कालखंड प्रकाशित करण्यात येतील. यापैकी प्राचीन कालखंड भाग - १, मध्ययुगीन कालखंड भाग - १ (खंड १ व २), मराठा कालखंड भाग - १ (शिवकाल) व मराठी कालखंड भाग - २, पेशवेकाल हे खंड प्रकाशित झाले आहेत. आधुनिक कालखंडाच्या (सन १८९१ ते १९४७) आणि (१९४८ ते २०१०) या खंडांच्या संपादनाचे काम करण्यासाठी या विषयातील तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात येत आहे.

४) मंडळाची इतर प्रकाशने

खाजगी प्रकाशकांमार्फत साधारणत: जी पुस्तके प्रकाशित करण्यास नकार दिला जातो; अशी पुस्तके जिज्ञासू, चोखंदळ तसेच सामान्य वाचकांस कमी किंमतीत उपलब्ध करुन देण्यासाठी ही योजना राबविली जाते. मराठीतील प्रतिभावंत साहित्यिकांच्या साहित्याचे पुनर्मुद्रण तसेच समाज परिवर्तन घडविण्यास मदत होऊ शकेल असे थोर विचारवंतांचे वाङ्मय, असामान्य व्यक्तिंची चरित्रे या योजनेत प्रकाशित करण्यात येतात. 'संपूर्ण गडकरी भाग-१ व २', 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', 'लोकहितवादी समग्र वाङ्मय', 'आगरकर समग्र वाङ्मय खंड १ ते ३', 'आचार्य भागवतांचे संकलित वाङ्मय',

'प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय खंड १ ते ५,' 'केशवसुतांची कविता' (हस्तलिखिताची यथामूळ आवृत्ती) अशा प्रकारची पुस्तके मंडळाने प्रकाशित केली आहेत. नामदेव गाथा, भावार्थ रामायण, संत तुकाराम बाबांची गाथा (१९५० मध्ये प्रकाशित केलेली) ही पुस्तके छपाईसाठी मुद्रणालयाकडे सोपविली आहेत.

महाराष्ट्राचे शिल्पकार

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या व्यक्तिंनी भर घातली आहे, त्यांच्या जीवनकार्यावर आधारित साधारणत: शंभर ते सव्वाशे पानांची चरित्रे 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या योजनेंतर्गत प्रकाशित करण्यात येतात. या योजनेत आतापर्यंत एकूण ३२ महनीय व्यक्तींची चरित्रे प्रकाशित करण्यात आली आहेत. तसेच आणखी ४० ते ४५ चरित्रे प्रकाशित करावयाची आहेत.

७) ललितेतर वाङमयाच्या प्रकाशनार्थ अनुदान

८) मराठी वाङ्मयकोशाचे संपादन व प्रकाशन

९) मराठी शब्दकोशाचे संपादन व प्रकाशन

१०) बोलीभाषाविषयक प्रकाशन

मराठी वाङमयकोश आणि शब्दकोश

११) वाङ्मयकोश

मराठी वाङ्मयकोशाचे संपादन व प्रकाशन या योजनेनुसार मराठी वाङ्मयकोश ४ खंडात संपादित करुन प्रकाशित केले जाईल. मराठी वाङ्मयकोशाचे स्वरुप सामान्यत: इंग्रजी भाषेतील 'ऑक्सफर्ड कम्पॅनियन व्हॉल्यूम टू इंग्लिश लिटरेचर'च्या अनुक्रमे स्टेनबर्ग शिप्ले व प्रेमिंजर यांनी संपादित केलेल्या 'ए डिक्शनरी ऑफ लिटरेचर इन इंग्लिश ल्यँग्वेज, द एन्सायक्लोपीडिया ऑफ पोएट्री अँड पोएटिक्स डिक्शनरी वर्ल्ड लिटररी टर्म्सच्या' संदर्भ ग्रंथासारखे आहे. मराठी भाषेचे अभ्यासक, सर्वसामान्य वाचक व मराठी वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वाङ्मय कोश उपयुक्त ठरणार आहे. वाङ्मयकोशाचा पहिला खंड मे १९७९ मध्ये, खंड चौथा नोव्हेंबर २००२ मध्ये व खंड दुसरा भाग पहिला मे २००३ मध्ये प्रकाशित झाला आहे. खंड २, भाग २ च्या संपादनाचे काम डॉ. दिलीप धोंडगे यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. तिसरा खंड मुद्रणासाठी सोपविण्यात आला असून लवकरच तो प्रकाशित होईल.

१२) शब्दकोश

आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या संदर्भात आजच्या मराठी वाचकांची शब्दकोशविषयक गरज व्यापक झाली आहे. म्हणून भाषिक पृथ:करणाचा व ऐतिहासिक आणि तुलनात्मक भाषिक अभ्यास पद्धतीचा उपयोग करुन या अभिनव कोशाची रचना करण्यात आली आहे. या कोशात जवळजवळ दीड लाख शब्द असतील व तो १० खंडात प्रकाशित करण्यात येईल. आतापर्यंत संपादित झालेले मराठी शब्दकोशाचे खंड तपासून घेण्याचे व त्यापुढील खंडांच्या संपादनाचे काम प्रा. रामदास डांगे यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. या शब्दकोशाचा पहिला व दुसरा खंड प्रकाशित

झाला असून तिसरा खंड मुद्रणपूर्व अवस्थेमध्ये आहे.

१३) विज्ञान आणि तंत्रज्ञान कोश

मंडळाने विज्ञानाशी संबंधित अनेक ग्रंथ प्रकाशित केले असले तरी गेल्या ४०/५० वर्षामध्ये जागतिक व राष्ट्रीय स्तरावर विज्ञान विषयक नव्या संकल्पना विकसित झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील नवशिक्षित आणि सर्वसामान्य जनतेला आधुनिक ज्ञान विज्ञान संकल्पना उपलब्ध व्हाव्यात या हेतूने विज्ञान आणि तंत्रज्ञान कोश प्रसिद्ध करण्याचा मंडळाने निर्णय घेतला व या प्रकल्पाच्या संपादनाचे काम मराठी विज्ञान परिषद, मुंबई या ख्यातनाम वैज्ञानिक संस्थेकडे सोपविले. या संस्थेने संपादित केलेल्या कोशाचे प्रकाशन करण्यात आले असून या खंडास वाचकांनी प्रचंड प्रतिसाद दिला आहे. सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत योजनेखाली 'प्राथमिक शिक्षण परिषदे'मार्फत या कोशाचे वितरण सुरु आहे.

१४) ललितेतर वाङ्मय

ललितेतर वाङ्मय प्रकाशनार्थ अनुदान या योजने अंतर्गत मराठीत लिहिलेल्या शास्त्रीय व तांत्रिक विषयावरील संशोधनपर व वैशिष्ट्यपूर्ण अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा विचार या अनुदानासाठी केला जातो.

नवलेखकांना प्रोत्साहन अनुदान योजना

१५) **नवलेखकांना प्रोत्साहन –** या योजने अंतर्गत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही अशा लेखकांना कथा, कादंबरी, काव्य, नाटक एकांकिका, ललितगद्य, बालवाङ्मय या लेखनाच्या प्रकाशनासाठी अनुदान दिले जाते.

१६) नवलेखकांना प्रोत्साहन अनुदान या योजने अंतर्गत

१) ललित वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ योजना

२) यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार

३) नवलेखकांची कार्यशाळा, चर्चासत्रे हे तीन उपक्रम राबविले जातात.

१७) आजपर्यंत मंडळाने नवलेखकांच्या एकूण **२०३९ पुस्तकांच्या प्रकाशनार्थ** अनुदान मंजूर केले असून त्यापैकी २०३७ पुस्तके प्रकाशित झाले आहे.

१८) नवलेखक प्रोत्साहन अनुदान योजनेत प्रकाशित पुस्तकांपैकी उत्कृष्ट पुस्तकांची निवड करुन त्यांना यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार दिला जातो.

१९) हा पुरस्कार काव्य, कथा, कादंबरी, नाटक, एकांकिका, ललितगद्य, बालवाङ्मय या सहा प्रकारात दिला जातो.

२०) उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीसाठी सरफोजीराजे भोसले उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार दिला जातो.

२१) नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे आणि त्यांच्या लेखनात सुधारणा व्हावी, म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

२२) नवलेखक अनुदान योजनेची कार्यपद्धती

या योजने अंततर्गत

* नवलेखकांकडून हस्तलिखित मागविण्यासाठी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात दिली जाते.

* जाहिरातीनुसार दरवर्षी प्राप्त झालेल्या हस्तलिखितांची पृष्ठसंख्या तपासली जाते. वाङ्मय प्रकारानुसार विभागणी करुन त्यांची प्राथमिक तपासणी केली जाते.

* नवलेखक अनुदान समितीच्या बैठकीतही हस्तलिखिते ठेवली जातात.

* हस्तलिखितांवर अभिप्राय घेण्यासाठी तज्ज्ञांची यादी तयार केली जाते.

* ही सर्व हस्तलिखिते त्या त्या विषयातील तज्ज्ञांकडे अभिप्रायार्थ पाठविली जातात.

* तज्ज्ञांकडून अभिप्राय आल्यानंतर नवलेखक प्रोत्साहन अनुदान समितीच्या बैठकीत उपलब्ध अनुदानानुसार किती पुस्तके प्रकाशित करावयाची आहेत याबाबतचा निर्णय घेतला जातो.

* मंडळाने मान्यता दिल्यानंतर पुस्तके प्रकाशित करण्यासाठी प्रकाशकांकडे पाठविली जातात.

२३) **साहित्य संस्थांना अनुदान**

'मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी अनुदान' योजने अतंर्गत शासनामार्फत १९८९-९० सालापासून

१) अखिल भारतीय साहित्य महामंडळ

२) विदर्भ मराठी साहित्य संघ, नागपूर

३) मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद

४) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

५) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई

अशा ५ संस्थांना दरवर्षी प्रत्येकी रक्कम रु. ५.०० लाख अनुदान देण्यात येते. १९९३-९४ पासून कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी व २०००-२००१ पासून दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या संस्थांचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

सुवर्णमहोत्सवी प्रकल्प

महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त मंडळाने खालील दोन नवीन योजना हाती घेतल्या आहेत.

मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास आणि मराठी चित्रपटसृष्टीचा इतिहास

२४) **मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास**

मराठी नाटक आणि रंगभूमीचा अद्ययावत इतिहास ग्रंथरुपाने मराठी भाषेत उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्यामुळे हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या ग्रंथ प्रकल्पाचे संपादनाचे काम प्रा. दत्ता भगत यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

२५) **मराठी चित्रपटसृष्टीचा इतिहास**

* भारतीय चित्रपट सृष्टीला मराठी चित्रपटांनी समृद्ध केले आहे. भारतीय चित्रपटांच्या इतिहासात मराठी चित्रपटांनी बजावलेली महत्त्वपूर्ण कामगिरी लक्षात घेऊन मराठी चित्रपटांचा समग्र इतिहास ग्रंथरुपाने देण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

* हा प्रकल्प ज्येष्ठ चित्रपट समीक्षिका आणि अभ्यासक रेखा देशपांडे यांच्याकडे सोपविला आहे.

२३) वरील विविध योजना राबविण्यासाठी मंडळाच्या विषयवार समित्या आहेत. बैठकीत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी पुढीलप्रमाणे केली जाते.

* समित्यांच्या व मंडळाच्या बैठकीचे आयोजन
* व्यक्ती/संस्थांकडून तसेच शासनाकडून मंडळाकडे आलेल्या विषयानुसार विषयसूची तयार केली जाते.
* मंडळाच्या वतीने प्रकाशनांसाठी पुस्तकांची निवड केली असल्यास या हस्ततिखितावर संस्कार करून ते मुद्रणालयाकडे सोपविले जाते.
* पुस्तकाच्या भाषांतराचे काम ज्यांच्याकडे सोपविले असेल त्यांच्याकडून प्रथम नमुना लेखन/भाषांतर मागविले जाते.
* त्यावर तज्ज्ञांचा अभिप्राय घेतला जातो.
* विषय संमत झाल्यावर तज्ज्ञांच्या सूचनांसह पुस्तकाचे लेखन/भाषांतर संबंधितांकडे सोपविले जाते.
* हस्तलिखित तयार होईपर्यंत लेखक/ भाषांतरकारांशी सातत्याने पत्रव्यवहार केला जातो.
* पुस्तके मुद्रणालयास सोपविल्यापासून ते प्रकाशित होईपर्यंत मुद्रणालयाशी पत्रव्यवहार केला जातो.
* बैठकीत घेतलेल्या निर्णयाची कालबद्ध अंमलबजावणी केली जाते.

२७) साहित्यिकांना गौरववृत्ती

या योजने अंतर्गत कला व साहित्य क्षेत्रातील ज्येष्ठ मराठी साहित्यिक आणि कलावंतांना गौरववृत्ती देऊन त्यांचा सत्कार केला जातो. मंडळाच्या बैठकीत गौरववृत्ती द्यावयाच्या साहित्यिक / कलावंतांची निवड केली जाते. रु. ५०,०००/- मानपत्र, शाल व श्रीफळ असे या गौरववृत्तीचे स्वरुप आहे.

नियतकालिकांना अनुदान

२८) मंडळातर्फे दरवर्षी ४४ वाङ्मयीन नियतकालिकांना सहाय्य केले जाते.

२९) त्याची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे आहे.

* व्यक्ती किंवा संस्थांकडून अनुदानासाठी प्राप्त अर्ज मंडळाच्या बैठकीपुढे ठेवले जातात.
* त्यावर तज्ज्ञांचा अभिप्राय घेतला जातो.
* तज्ज्ञांचा अभिप्राय आल्यावर तो पुन्हा बैठकीत ठेवला जातो.
* अनुदानाचा निर्णय झाल्यावर व्यक्ती/संस्थांना अनुदान देण्याची कार्यवाही केली जाते.
* अनुदान विषयक अटींची पूर्तता केली जाते.
* लेखापालांच्या अहवालावर कार्यवाही केली जाते.

३०) या नियतकालिकांना मंडळ दरवर्षी प्रत्येकी रु. १५ ते ३५ हजार अनुदान देते.

३१) राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद खालील मान्यवर साहित्यिकांनी भूषविले आहे.

१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

२. डॉ. सुरेंद्र बारलिंगे

३. डॉ. यशवंत मनोहर

४. डॉ. य. दि. फडके

५. श्री. विद्याधर गोखले

६. डॉ. मधुकर आष्टीकर

७. प्रा. द. मा. मिरासदार

८. प्रा. सुरेश द्वादशीवार

९. प्रा. रा. रं. बोराडे

१०. प्रा. रतनलाल सोनग्रा

११. पद्मश्री मधु मंगेश कर्णिक

३२) मंडळाच्या बैठकींचे आयोजन महाराष्ट्रात विविध ठिकाणी केले जाते.

३३) मंडळामार्फत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास दरवर्षी रु. २५.०० लाख अनुदान दिले जाते.

३४) मंडळामार्फत प्रकाशित पुस्तकांच्या विक्रीचे स्टॉल्स साहित्य संमेलनामध्ये लावण्यात येतात.

३५) ई-बूक/सीडी/वेबसाईट याद्वारे अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचण्याचा संकल्प मंडळाने केला आहे.

पत्ता

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, मुंबई - ४०० ०२५.

संपर्क

दूरध्वनी क्र. २४३२५९२९/२४३२५९३०
फॅक्स नं. २४३२५९३१

ई-मेल

secretary.sblc@gmail.com

Website

http:/mahasahityaasanskriti.maharashtra.gov.in

• • •



महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेली चरित्रे
महाराष्ट्राचे शिल्पकार (प्रकाशित)

१. महाराष्ट्राचे शिल्पकार - एस. एम. जोशी
२. महाराष्ट्राचे शिल्पकार - साने गुरुजी
३. महाराष्ट्राचे शिल्पकार - आचार्य धर्माधिकारी
४. महाराष्ट्राचे शिल्पकार - नाना पाटील
५. महाराष्ट्राचे शिल्पकार - डॉ. विठ्ठलराव विखे पाटील
६. महाराष्ट्राचे शिल्पकार - शंकरराव किर्लोस्कर
७. मामासाहेब जगदाळे
८. महाराष्ट्राचे शिल्पकार - तंट्या भिल्ल
९. महाराष्ट्राचे शिल्पकार - यशवंतराव चव्हाण
१०. महाराष्ट्राचे शिल्पकार - दादासाहेब फाळके
११. महाराष्ट्राचे शिल्पकार - ताराबाई शिंदे
१२. महाराष्ट्राचे शिल्पकार - तेजस्विनी अहिल्याबाई होळकर
१३. महाराष्ट्राचे शिल्पकार - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
१४. महाराष्ट्राचे शिल्पकार - स्वातंत्र्यवीर सावरकर
१५. महाराष्ट्राचे शिल्पकार - बॅ. राजाभाऊ खोब्रागडे
१६. महाराष्ट्राचे शिल्पकार - स्वामी रामानंद तीर्थ
१७. महाराष्ट्राचे शिल्पकार - पठ्ठे बापूराव
१८. महाराष्ट्राचे शिल्पकार - भाई उद्धवराव पाटील
१९. महाराष्ट्राचे शिल्पकार - महर्षी धोंडो केशव कर्वे
२०. महाराष्ट्राचे शिल्पकार - लोकहितवादी
२१. महाराष्ट्राचे शिल्पकार - यदुनाथ थत्ते
२२. महाराष्ट्राचे शिल्पकार - गोविंदभाई श्रॉफ
२३. महाराष्ट्राचे शिल्पकार - रामजोशी
२४. महाराष्ट्राचे शिल्पकार - वसंतराव नाईक
२५. महाराष्ट्राचे शिल्पकार - महात्मा ज्योतिबा फुले
२६. महाराष्ट्राचे शिल्पकार - तुळशीदास जाधव
२७. महाराष्ट्राचे शिल्पकार - शंकरराव चव्हाण
२८. महाराष्ट्राचे शिल्पकार - पंडिता रमाबाई
२९. महाराष्ट्राचे शिल्पकार - ना. ग. गोरे
३०. महाराष्ट्राचे शिल्पकार - बॅ. नाथ पै
३१. महाराष्ट्राचे शिल्पकार - विनोबा भावे
३२. महाराष्ट्राचे शिल्पकार - शंकरराव मोहिते पाटील

मंडळाने प्रकाशित केलेली १०० महत्त्वाची पुस्तके

१. मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष (कै. न्या. म. गो. रानडे लिखित "Rise of the Maratha Power" चा अनुवाद), प्रा. न. र. फाटक

२. नानासाहेब पेशवे आणि स्वातंत्र्ययुद्ध (आनंद स्वरुप मिश्रा लिखित "Nanasaheb Peshwa & fight for freedom" चा अनुवाद), डॉ. वा. रा. ढमढेरे

३. असे होते मोगल ("Storia Do Mogar" By Niccolao Manucci चा सारांश अनुवाद (१९८४), श्री. ज. स. चौबळ

४. पाश्चात्य रोग चिकित्सा खंड १ व २ डॉ. बो. मॉ. लिखित "Medicine Essentials for Practitioners and Students" चा अनुवाद), डॉ. मधुकर रानडे,

५. आयुर्वेदीय शब्दकोश भाग १ व २ (संस्कृत-संस्कृत) (१९६८), संपादक, पं. वेणीमाधवशास्त्री जोशी आणि कै. पं. ना. ह. जोशी

६. आयुर्वेदिय शब्दकोश भाग १ व २ (संस्कृत-संस्कृत-मराठी) (१९६८), संपादक, पं. वेणीमाधवशास्त्री जोशी आणि कै. पं. ना. ह. जोशी

७. अभिनय साधना (स्तानिस्लावस्कीच्या "An Actor Prepares" चा मराठी अनुवाद), श्री. के. नारायण काळे

८. रस-भाव विचार (भरत नाट्यशास्त्र: रससिद्धांत विषयक अध्याय ६ व ७ चे भाषांतर), प्रा. र. पं. कंगले

९. मुद्राराक्षस (विशाखादत्त विरचित 'मुद्राराक्षस'चे भाषांतर), डॉ. गो. के. भट

१०. संगीत रत्नाकर भाग-१ अध्याय १ ते ४ (श्रीनि:शाङ्र्गदेवविरचित संगीत रत्नाकर या संस्कृत ग्रंथाचे कलानिधी टीकेसह सटीप मराठी भाषांतर), प्रा. ग. ह. तारळेकर

११. स्टॅविन्स्कीचे सांगितिक सौंदर्यशास्त्र, प्रा. अशोक दा. रानडे

१२. धर्मशास्त्राचा इतिहास (पूर्वार्ध) आणि धर्मशास्त्राचा इतिहास (उत्तरार्ध) म. म. डॉ. पा. वा. काणे आणि श्री. य. आ. भट

१३. आर्थिक सिद्धांत व अर्धविकसित प्रदेश (गन्नर मिरदाल लिखित "Economic Theory & Under developed Regions"), श्रीमती सरला कारखानीस

१४. बुद्धी प्रेरणा व क्रांती भाग - १ (डॉ. एम.एन. रॉय लिखित "Reason, Romanticision & Revolution" चा अनुवाद), श्री. बा. रं. सुंठणकर

१५. बुद्धी प्रेरणा व क्रांती भाग - २ (डॉ. एम. एन. रॉय लिखित "Reason, Romanticision" चा अनुवाद), श्री. बा. रं. सुंठणकर

१६. सामाजिक करार (रुसो लिखित "Social Contract" चा अनुवाद), श्री. व. भ. कर्णिक

१७. स्वातंत्र्याविषयी (जे. एस. मिल लिखित "On Liberty" चा अनुवाद), श्री. व. भ. कर्णिक

१८. समाजवाद विरुद्ध भांडवलशाही (ए. सी. पिगू लिखित "Socialism Vs. Capitalism" चा अनुवाद), प्रा. जी. लु. गांधी

१९. विसावे शतक आणि समाजवाद सोशालिस्ट युनियनने प्रकाशित केलेल्या "Twentieth Century Socialism" चा अनुवाद), प्रा. कृ. ना. वळसंगकर
२०. पिता-पुत्र (तुर्गेनेव्ह लिखित "Fathers & Son" चा अनुवाद), प्रा. व. वि. बडवे
२१. गणिती तत्त्वज्ञानाचा परिचय (बर्ट्रान्ड रसेल लिखित "Introducation to Mathematical Philosophy" चा अनुवाद), प्रा. म. रा. राईलकर
२२. वैज्ञानिक तत्त्वज्ञानाचा उदय (हान्स रायसेन्बाख लिखित "Rise of Scientific Philososphy" चा अनुवाद), प्रा. ग. वि. कुंभोजकर
२३. कात्यायन शुल्बसूत्रे (संस्कृत), श्री. श्री. दा. खाडिलकर
२४. देवकार्तची चिंतने (देकार्तच्या "Meditations" चा अनुवाद), श्री. दि. य. देशमांडे
२५. डॉन क्विक्झोट भाग-१ व भाग-२ (सरव्हेंन्डीस लिखित "Don Quixote Pnrt I-II" चा अनुवाद), श्री. दा. न. शिखरे
२६. कालिदास (१९९९), म. म. डॉ. वा. वि. मिराशी
२७. इस्लामची सामाजिक रचना (रुबेन लेव्ही लिखित "Social Structure of Islam" चा अनुवाद), श्री. श्रीपाद केळकर
२८. इस्लामची जीवन पद्धती (जफर शरीफ लिखित कानून-इ-इस्लाम चा अनुवाद), प्रा. अ. प. सूर्यवंशी
२९. खड्गहस्त की संन्यस्त (१९७६) (स्तांदालच्या "Scarlret & Black" चा अनुवाद), श्री. गो. वि. वैद्य
३०. भूमिकाशिल्प (स्तानिस्लावस्की लिखित "Building a Character" चा अनुवाद), श्री. के. ना. काळे
३१. युद्ध आणि शांती (स्टॉलस्टायच्या "War & Peace" चा अनुवाद), प्रा. आ. ना. पेडणेकर
३२. तत्त्वज्ञानातील समस्या (बर्टांड रसेलच्या "Problems of Philosophy" चा अनुवाद), प्रा. मे. पुं. रेगे
३३. आक्रमण (कोनराड लॉरेन्झ लिखित "On Aggression" चा अनुवाद), श्री. दि. धों. कर्वे
३४. औरंगजेबाचा इतिहास (सर जदुनाथ सरकार लिखित "Hisotry of Aurangjeb" चा अनुवाद), डॉ. भ. ग. कुंटे
३५. दुसरे महायुद्ध (सर विस्टन चर्चिल लिखित "The Second World" चा अनुवाद), श्री. वि. वा. कुवाडेकर
३६. वैज्ञानिक परिभाषिक संज्ञा (वनस्पतिशास्त्र संज्ञा संग्रह), प्रा. शं. आ. परांडेकर
३७. पंचोपाख्यान (महानुभवीय ग्रंथाची संशोधित व संपादित आवृत्ती) (१८७९), डॉ. वि. भि. कोलते
३८. शेक्यपिअर परिचय ग्रंथ, संपादित
३९. सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, म. म. डॉ. वा.वि. मिराशी
४०. मराठी वाङ्मयकोश खंड-१ (१९७९), श्री. गं. दे. खानोलकर
४१. ज्ञानेश्वरीची प्रस्तावना आणि ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण (द्वितीय आवृत्ती), डॉ. शं. गो. तुळपुळे
४२. काव्ये आणि विज्ञाने (Poetries & Science

by IA Richards) चा अनुवाद), रा. भि. जोशी

४३. महात्मा फुले समग्र वाङ्मय (पाचवी आवृत्ती), धनंजय कीर, स. गं. मालेश/य.दि. फडके

४४. लिओनार्दी दा. विंची (एस. फेंड लिखित "Leonardo Da Vinchi" चा अनुवाद), प्रा. प्र. ना. परांजपे

४५. खगोलशास्त्राचे विश्व (द्वितीय आवृत्ती), डॉ. जयंत विष्णु नारळीकर

४६. साहित्य सिध्दांत (द्वितीय आवृत्ती), डॉ. स. गं. मालशे

४७. समानता (आर. एस. टवेनी लिखित "Equitity" चे भाषांतर), श्री. दिनकर साक्रीकर

४८. कौटिलीय अर्थशास्त्र, प्रा. र. पं. कंगले

४९. भाषाशुद्धी, स्वा. वि. दा. सावरकर

५०. मोगल साम्राज्याचा ऱ्हास (सर जदुनाथ सरकार लिखित "Fall of the Mughal Empire" चा अनुवाद), श्री. र. गं. विद्वांस

५१. मोगल दरबारची बातमीपत्रे खंड २ रा (सर जदुनाथ सरकार लिखित, ''अखबारात-ए-दरबार-इ-मुअल्ला'' चा अनुवाद) (२९८३), सेतुमाधवराव पगडी

५२. प्रेमचंद व्यक्ती आणि वाङ्मय, चंद्रकांत बांदिवडेकर

५३. सामाजिक थर (एम. एम. तुमीन लिखित "Social Stratification" अनुवाद), सौ. सरला कारखानीस

५४. संपूर्ण गडकरी खंड - १ व २ (१९८४), रा. ग. गडकरी

५५. आगरकर वाङ्मय खंड - १, म. गं. नातू व दि. य. देशपांडे

५६. ओदिसी (होमर लिखित "The Odyssey" चे भाषांतर) (१९८४), शा. नि. ओक

५७. गायन महर्षी अल्लादियाखां यांचे चरित्र (१९८४), गोविंदराव टेंबे

५८. वंश आणि वंशवाद (रुथ बेनेडिक्ट लिखित "Race & Reaceism" या पुस्तकाचा अनुवाद) (१९८५), सौ. मीनाक्षी दिक्षीतफ

५९. सम्राट अकबर (डॉ. श्रीवास्तव लिखित "Akbar the Great" चा अनुवाद), प्रा. रा. मा. गोळे

६०. डॉन संथ वाहतच आहे. भाग २ (शोलोखोव यांच्या "An Quiet Flows The Don" चा अनुवाद), नरेंद्र सिंदकर

६१. नाट्यमंडप (भारतीय प्रणीत), डॉ. र. पु. कुलकर्णी

६२. पाणिनीय व्याकरण आणि भाषा तत्त्वज्ञान, व्याकरणरत्न पंडित वामनशास्त्री भागवत

६३. इलियद (ग्रीक महाकवी होमर लिखित "Illid" चा अनुवाद) (१९८६), शा. नि. ओक

६४. डॉन संथ वाहतच आहे. भाग १ ला (शोलोखो यांच्या "And Quiet Flows The Don" चा अनुवाद) (१९८६), नरेंद्र सिंदकर

६५. सत्यशोधक समाजाचा इतिहास प्रस्तावना खंड, महेश जोशी

६६. महात्मा गांधी - रवींद्रनाथ ठाकूर, वा. वि. गोखले

६७. महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख (१९८८), डॉ. वि. भि. कोलते

६८. झुंडशाहीचे बंड (ओ. वा. गॅसेट लिखित "Revolt of Masses" चा अनुवाद) (१९८८), श्री. बा. रं. सुंठणकर

६९. भारतीय लिपीचे मौलिक एकरुप (१९८८), श्री. पंडित गणपती शास्त्री हेब्बर संपादक श्रीनिवास जनार्दन मोडक

७०. सेनापती बापट समग्र वाङ्मय खंड ४ था (१९८८), वामनराव बापट
७१. सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय (द्वितीय आवृत्ती), डॉ. मा. गो. माळी
७२. पाकिस्तानाचे जन्मरहस्य, श्री. वसंत नगरकर
७३. गडकऱ्यांची नाटके:चिंतन आणि आकलन (१९८९), श्री. स. पा. पाजणकर
७४. बंधाऱ्याचे स्थापत्य शास्त्र खंड-१ ला (१९८८), विनायक हरी केळकर
७५. एमिली डिकन्सन : निवडक कविता (१९९०), मधुकर नाईक
७६. ग्रीक शोक नाट्ये, शांता वैद्य, माधुरी भिडे आणि पद्मजा पाठक
७७. रामायणावर नवा प्रकाश (द्वितीय आवृत्ती), भास्करराव जाधव
७८. तिसरी लाट, अनु. शरदिनी मोहिते
७९. जाती उद्गम "The Origin of Species" या चार्ल्स डार्विन लिखित पुस्तकाचा आशयानुवाद), प्रा. प्रमोद दोशी
८०. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, शंकरभाई पटेल
८१. मृगपक्षिशात्र, संपा. मारुती चितमपल्ली, प. नरसिंहशास्त्री भातखंडे
८२. 'सत्याग्रही समाजवाद' आचार्य जावडेकर निवडक लेखसंग्रह, संपा. सुहास पळशीकर
८३. प्रबोधनकर ठाकरे समग्र वाङ्मय खंड-१ (माझी जीवनगाथा), संपा. पंढरीनाथ सावंत
८४. कर्मवीर भाऊराव पाटील 'कल आणि कर्तृत्व' (१९८८), संपा. डॉ. मा. गो. माळी
८५. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे - निवडक वाङ्मय, संपादक मंडळ
८६. भूगोलाचे स्वरुप (The Nature of Geography), मा. स. मराठे
८७. ग. त्र्यं. माडखोलकर व्यक्तित्व आणि कर्तृत्व, संपादक मंडळ
८८. पंडित जवाहरलाल नेहरु, संपादन-प्रा. बा. ह. कल्याणकर
८९. महाराष्ट्राचा मध्ययुगीन इतिहास (मध्ययुगीन कालखंड १), संपादन-गो. त्र्यं. कुलकर्णी
९०. महाराष्ट्राचा इतिहास (प्रागैतिहासिक महाराष्ट्र) (खंड पहिला, भाग १), शांताराम भालचंद्र वैद्य
९१. लोकसंस्कृतीतील स्त्री रुपे, डॉ. कृष्णा इंगोले
९२. मराठी वाङ्मयकोश, खंड २, भाग १, संपादक-डॉ. गो. म. कुलकर्णी
९३. कौटिलीय अर्थशास्त्रातील शिल्पशास्त्र, डॉ. र. पु. कुलकर्णी
९४. कलेची मूलतत्त्वे, डॉ. मिलिंद मालशे
९५. लोकजीवन आणि लोकसंस्कृती, संपादक - डॉ. द. ता. भोसले
९६. महान भारतीय क्रांतिकारक (प्रथम पर्व १७७० ते १९००), श्री. सर्वोत्तम धनाजी झांबरे
९७. बुद्धलीलासारसंग्रह (द्वितीय आवृत्ती), धर्मानंद कोसंबी
९८. फार्सी मराठी अनुबंध, डॉ. यु. म. पठाण
९९. केशवसुतांची कविता (पुनर्मुद्रण), संपादक मंडळ
१००. मराठी शब्दकोश खंड-१, संपादक मंडळ
१०१. विज्ञान आणि तंत्रज्ञान, मराठी विज्ञान मंडळ

• • •

नियतकालिकांना अनुदानाचा आधार

(विशिष्ट विषयाला वाहिलेल्या नियतकालिकांना अनुदान)

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना १९ नोव्हेंबर १९६० रोजी झाली, तेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळून १३ वर्षे झाली होती; तर महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन अवघे सहा महिने झाले होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी ज्या क्रांतीकारकांनी स्वत:चे रक्त सांडले त्यांचे योगदान मुळीच विसरता येणार नाही. पण, त्याचबरोबर ज्या समाज, साहित्य, संस्कृती सारख्या घटकांनी विविध जाती-धर्माच्या क्रांतीकारकांना एकत्र बांधले, कथा-कविता, नाटक, सिनेमा यांच्या माध्यमातून स्वातंत्र्याची चेतना जागविली, त्या साहित्य-संस्कृतीचे आपण काही देणे लागतो ही जाणीव महाराष्ट्राचे तत्कालिन मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना होती. त्याचबरोबर एक विचारप्रवाह असा देखील होता की आता आपल्या विकासाची जबाबदारी ही आपलीच आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासाबाबत आता परकिय सत्ताधाऱ्यांना फारसा दोष देता येणार नाही. कारण आता आपलेच लोक (स्वकीय) विकासाची धोरणे ठरविणार आहेत. तेव्हा अशा परिस्थितीत समाजातील सर्व घटकांचा विकास व्हावा, त्यांचे प्रश्न समाजासमोर, शासन व्यवस्थेसमोर यावेत या उद्देशाने काही सामाजिक चळवळी सुरु झाल्या. या सामाजिक चळवळींनी आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी स्वत:चे साहित्य प्रकाशित करण्यास सुरुवात केली. समाज कल्याणाचा वसा घेऊन सुरु झालेल्या सामाजिक चळवळी फायदा-तोटा या आर्थिक बाबींचा विचार करता नेहमीच तोट्यामध्ये असतात. अशा सामाजिक चळवळींद्वारे प्रकाशित होणाऱ्या साहित्याला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाद्वारे अनुदान दिले जाते, अशा अनुदान प्राप्त सामाजिक चळवळींच्या साहित्याचा (नियतकालिकांचा) हा परिचय.

हाकारा

'हाकारा' हे त्रैमासिक १९८० पासून सुरु आहे. केवळ आदिवासी विषयाला वाहिलेल्या या त्रैमासिकाद्वारे आदिवासींचे आरोग्य, शिक्षण, रोजगार, जंगल, धरण आदी विषयांवर लेख प्रसिध्द झाले आहेत.

पत्रव्यवहाराचा पत्ता : महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, ६४, आनंद पार्क, औंध, पुणे-७. दूरध्वनी (०२०) २५८९७२९८

प्रेरक ललकारी

'प्रेरक ललकारी' हे मासिक १९८६ पासून स्त्री मुक्ती संघटने मार्फत प्रकाशित केले जाते. या मासिकाने आतापर्यंत स्त्रियांचे विविध प्रश्न जसे की लैंगिक शोषण, कौटुंबिक अत्याचार, शिक्षण इत्यादी विषयांना वाचा फोडली आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता : ३१, श्रमिक लो. टिळक वसाहत, मार्ग क्र. ३, दादर (पू.), मुंबई - १४. दूरध्वनी - (०२२) ६५७४५८४८

बायजा

हे नियतकालिक १९७७ पासून प्रकाशित होत आले आहे. यामधून स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यात आली आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता : २४, चित्रदुर्ग, क्षिप्रा सोसायटी, कर्वे नगर, पुणे - ५२. दूरध्वनी -०२०-२५४४०१२०

भाषा आणि जीवन

मराठी अभ्यास परिषदेतर्फे १९८३ पासून हे त्रैमासिक प्रसिध्द केले जाते. केवळ मराठी भाषा या विषयावर अभ्यासपूर्ण लेख यात असतात.

पत्रव्यवहाराचा पत्ता : १, शीतल अपार्टमेंट, ४६/४, एरंडवणे, पुणे - ०४. दूरध्वनी - ०२०-२५४३३८६९

परामर्श

'परामर्श' हे त्रैमासिक १९७९ पासून पुणे विद्यापीठाच्या तत्वज्ञान विभागातर्फे प्रकाशित होत आहे. इंग्रजी आणि हिन्दी भाषेत देखील हे त्रैमासिक प्रसिध्द हेते. कार्लमार्क्स विटेजेंस्टीन आणि विज्ञान या विषयावर प्रसिध्द झालेले परामर्शचे अंक विशेष दखल घेण्यासारखे आहेत.

पत्रव्यवहाराचा पत्ता : तत्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे - ०७. दूरध्वनी : ०२०-२५६०१३१५/२५६९०९८२

मराठी विज्ञान परिषद पत्रिका

विज्ञान-तंत्रज्ञान विषयक माहिती मराठी भाषेतून पोहोचविण्याचे कार्य मराठी विज्ञान परिषद करत आहे. या परिषदेतर्फे १९६७-६८ च्या सुमारास या परिषदेने 'मराठी विज्ञान परिषद वार्तापत्र' या नावाने सुरु केलेले मासिक १९६८ पासून 'मराठी विज्ञान परिषद पत्रिका' या नावाने ओळखले जावू लागले.

पत्रव्यवहाराचा पत्ता : मराठी विज्ञान परिषद, विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी (पूर्व), मुंबई - २२. दूरध्वनी : ०२२-२४०५४७१४

अक्षरवैदर्भी

जनसाहित्य परिषदेतर्फे १९८४ पासून दर महिन्याला हे मासिक प्रसिध्द होते. सर्वसामान्य लोकांमधील मग ते अभिजन, दलित, आदिवासी कुठलेही असो, त्यांच्या साहित्याची निर्मिती, समीक्षा, संशोधन, संवर्धन यास प्रोत्साहन देण्याचे काम 'अक्षरवैदर्भी' ने केले आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता : जनसाहित्य भवन, गणेश कॉलनी, अमरावती. दूरध्वनी क्र. : ०७२१-२५७७४१८

मिळून साऱ्याजणी

हे मासिक १९८९ पासून सुरु आहे. पत्रकारीतेच्या क्षेत्रात स्त्रियांना व्यासपीठ मिळवून देण्याच्या हेतुने सुरु झाले हे मासिक स्त्री-पुरुष समतेचा विचार समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचवणे, शहरी व ग्रामीण जीवनाला जोडणारा दुवा म्हणून काम करणे या उद्देशाने देखील कार्यरत आहे.

पत्रव्यवहाराचा पत्ता : ४०११/१/ब, भोंडे कॉलनी, कर्वे रोड, पुणे-०४. दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५४३३२०७

ब्रेन टॉनिक

मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांमधून प्रसिध्द होणारे मासिक आहे. सामान्य ज्ञान, शालेय विद्यार्थ्यांसाठी तयार करावयाचे प्रोजेक्टस्, अशा विविध विषयांवर यातून माहिती मिळते. मुलांच्या लेखन कौशल्याला चालना देण्याचे कामही या मासिकाद्वारे केले जाते.

पत्रव्यवहाराचा पत्ता : टपाल पेटी क्र. १, २४, चेरी हिल, पाईपलाईन रोड, नाशिक - १३. दूरध्वनी : ०२३५३-२३४२११३

मैत्रीच्या पलिकडे

विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यात वैचारीक देवाण घेवाण व्हावी म्हणून १९७१ पासून पुण्याच्या विद्यार्थी सहायक समिती द्वारे हे मासिक प्रसिध्द होते.

पत्रव्यवहाराचा पत्ता : विद्यार्थी सहायक समिती, ११८२/१/४, शिवाजी नगर, एफ. सी. रोड, पुणे ४११ ००५. दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१

वरील नियतकालिकांशिवाय पुढील नियतकालिकांना देखील महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्यामार्फत अनुदान दिले जाते.

नवभारत, सातारा

नव अनुष्टुभ, मुंबई

संगीत कलाविहार, मीरज

पंचधारा, हैद्राबाद

अर्थसंवाद, सातारा

कथामाला, मुंबई

प्रबोधन प्रकाशन ज्योती, कोल्हापूर

महिला आंदोलन पत्रिका, मुंबई

शिक्षण समीक्षा, नागपूर

प्रतिष्ठान, औरंगाबाद

आरती, सिंधुदुर्ग

वास्तव रुपवाणी, मुंबई

पालकनीती, पुणे

झपूर्झा, रत्नागिरी

लोकानुकम्पा, नागपूर

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, उजळाईवाडी

ऋग्वेद, कोल्हापूर

मनोयुवा, नाशिक

संशोधक, धुळे

आमची श्रावणी, कोल्हापूर

ब्रेल जागृती, मुंबई

केल्याने भाषांतर, पुणे

अस्मितादर्श, औरंगाबाद

मराठी संशोधन पत्रिका, मुंबई

महाराष्ट्र भूगोल शास्त्र संशोधन पत्रिका, पुणे

आकांक्षा, नागपूर

• • •

Am{Xdmgr g§ñH¥$Vr OmJ{VH$sH$aUmÀ`m {di»`mV

प्रा. डॉ. सुनील पं. उगले

भारतीय समाजातील सर्वात मागासलेला समाज म्हणून आदिवासी समाज ओळखला जातो. तसेच आज तो सर्वाधिक दुर्लक्षित घटक आहे हे आजमितीस मान्य करण्यात येते. आदिवासींचा मागासलेपणा सर्वव्यापी स्वरूपाचा आहे. या समाजात आर्थिक मागासलेपणा, दारिद्र्य, बेरोजगार, निरक्षरता, अंधश्रध्देचा पगडा, कुपोषण, अनारोग्य ही सर्व वैशिष्टे आदिवासी समाजात आढळून येतात. विकसनशील देशासमोर असलेल्या समस्या आदिवासींचे सर्वाधिक प्रमाण असल्यास त्या अधिक प्रकर्षाने जाणवतात. अनेक आदिवासी जमाती अगदी आरंभिक अवस्थेत असून यापैकी काही जमाती बाहेरच्या समाज व संस्कृती यांचा संपर्क येऊनही आपल्या जीवनशैलीत, समाज व्यवस्थेत त्यांनी जवळपास काहीही बदल केलेला नाही. पण अशा जमाती थोड्या आहेत. त्याचवेळी नागर समाज व संस्कृती यांच्या संपर्कात आल्यावर स्वत:ची समाजव्यवस्था व जीवनशैली बदलत गेलेल्या आदिवासी जमातीही आढळतात.

सद्य:स्थितीत जगाला ग्लोबल व्हिलेज म्हटलं जाते. कारण जागतिकीकरणामुळे संपर्क व सुसंवादाची गती झपाट्याने वाढली आहे. या संपर्क माध्यमांमुळेच जगभरातील लोकांमध्ये समन्वय साधला गेला आहे. मात्र आदिवासी हा या वैश्विक खेड्याच्या तुलनेत अजूनही दूरच आहे. ''पळा-पळा कोण पुढे पळे तो'' या शर्यतीत तो अजूनही खूपच मागे आहे. या शर्यतीत धावताना आदिवासी माणसाचीच नव्हे तर आदिवासी चळवळीचीही दमछाक होताना दिसते. कारण विविध आदिवासी चळवळींमध्ये समन्वयाचा अभाव आहे. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकिय क्षेत्रात समन्वय निर्माण झाला तरच आदिवासी चळवळ सशक्त बनेल. अशा प्रकारची सशक्त चळवळ बदलत्या जागतिक संदर्भानुसार निर्माण होणाऱ्या समस्यांशी संघर्ष करु शकेल. जागतिकीकरणामुळे केलेल्या क्षेत्रातही चिंतनीय परिस्थिती अहे. आदिवासी स्वत:च्या कलेकडे दुर्लक्ष करुन प्रस्थापितांच्या अनेक गोष्टी स्वीकारत आहे. चांगल्या गोष्टींची देवाणघेवाण ही कधीही समाज विकासासाठी स्वागतार्ह बाब असते. पण त्यामुळे स्वत:च्या कलेकडे दुर्लक्ष करणे कधीही क्षम्य नाही. तसेच आंधळेपणाने नि चांगल्या वाईटाचा विचार न करता काही गोष्टी स्वीकारणे हे उचित नव्हे. ''आपलं ते जुनं, नि दुसऱ्याचं ते सोनं'' ही मानसिकता बदलायला पाहिजे. प्रस्थापित समाज वारली चित्रकला, आदिवासी नृत्ये या आदिवासी कलांचा वापर पैसे कमविण्यासाठीच करताना दिसतो.

जागतिकीकरणामधून भारताने विकासाचे जे प्रारुप स्वीकारले आहे त्यामधून पर्यावरणाचा नाश होणे अटळ आहे. वन्य जीवांचे संरक्षण करण्यासाठी जी सुरक्षित अरण्ये म्हणून जाहीर करण्यात आली आहेत तेथून आदिवासींची हकालपट्टी जरी कमी प्रमाणात होत असली तरी त्यामुळे आदिवासी

विस्थापित होत आहे. विस्थापनानंतर अनेक आदिवासी रानाबाहेर पडून अनेकदा शहरातील गरीब वस्तीत जाऊन राहतात. त्यामुळे त्यांच्या संस्कृतीतही फरक पडत आहे. पहिला फरक म्हणजे पुरुषांच्या आवडीनिवडीतील फरक होय. ते आता कपडे, मनोरंजन आणि इतर क्षुल्लक गोष्टींवर पूर्वीपेक्षा जास्त खर्च करतात. विस्थापनानंतर कुटुंबाला एकच नोकरी दिली जात असल्याने ती फक्त पुरुषाला मिळते. नोकरी लागली की तो वरिष्ठ जातीची संस्कृती आत्मसात करतो. विषमतेवर आधारलेल्या समाजात खालच्या वर्गातील लोक वरिष्ठ वर्गाची सांस्कृतिक मूल्ये आत्मसात करुन त्या दृष्टीने स्वत:ला कमी समजतात. त्यांच्या उपभोगाच्या सवयीतील फरक हा वरच्या वर्गाच्या संस्कृतीची मूल्ये आत्मसात करण्याचाच एक भाग आहे. आदिवासी स्त्रियांचा दर्जा कमी झाला हे त्याचेच निदर्शक आहे.

आदिवासी स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीने नसला तरी वरिष्ठ जातींच्या संस्कृतीत स्त्रियांचा जो दर्जा असतो त्यापेक्षा आदिवासी संस्कृतीत त्यांना बऱ्याच मानाने वागविले जाते. आता अनेक आदिवासी जमातीचे लोक स्त्रियांची जागा घरातच असते, त्यांनी गृहिणी होवून पुरुषांवरच अवलंबून राहण्यात समाधान मानले पाहिजे असे सांगू लागले आहेत. स्त्रियांचा दर्जा कमी होत जाण्याचा दुसरा पुरावा म्हणजे वधूला हुंडा देण्याऐवजी वराला हुंडा देणे हा होय. हुंड्यामध्ये होणारा हा बदल हे स्त्री ही आता एक लोढणे झाली आहे याचे हे द्योतक होय. दारु पिऊन स्त्रियांना मारणे हाही स्त्रियांवरील जुलुमाचाच प्रकार होय. प्रेक्षकांनी ग्राहक संस्कृती आत्मसात करावी. या दृष्टीने प्रसार माध्यमांनी जे काम चालविले आहे त्याचा परिणाम म्हणून पुरुष व मुले उपभोगाच्या वस्तूवर जास्त खर्च करतील आणि स्त्रियांची उपासमार वाढत जाईल. अशीही शक्यता आहे. संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगार अर्थव्यवस्थेच्या बाहेर फेकले जातात. हे खरे; पण आदिवासी केवळ आर्थिकच नव्हे तर राजकिय, सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेतून बाहेर फेकले जात आहे. हे सर्व घटक एकत्र आणल्याशिवाय त्यांच्या प्रश्नाला उत्तर सापडणार नाही.

आर्यांच्या आगमनापासून आजपर्यंत विकासाच्या नावाखाली पाश्चिमात्य उपभोगवादी संस्कृती अमेरिकेत गेली. आज अमेरिकेतून भारतात त्याच संस्कृतीचे पायघड्या घालून स्वागत होत आहे. जागतिकीकरणाच्या वरवंट्याखाली आदिवासींबरोबर बिगर आदिवासीही भरडले जात आहेत. भारतात खऱ्या अर्थाने १९९१ पासून जागतिकीकरणाला सुरुवात झाली. तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव व अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या पुढाकाराने भारताने नवे आर्थिक धोरण स्वीकारले. त्यात जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण ह्या त्रिसूत्रीचा स्वीकार करण्यात आला. जगातील विविध देशांनी जागतिकीकरणाचा अंगिकार केल्यामुळे जगातील प्रमुख विकसनशिल देशांमध्ये अत्यंत वेगाने तिथल्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकिय संरचनेमध्ये बदल घडून आले. मात्र आदिवासी समाजावर जागतिकीकरणाचे परिणाम अनुकूल कमी व प्रतिकूल जास्त झाल्याचे दिसून येते.

भारतात जागतिकीकरणाची सुरुवात झाली तेव्हा तिच्या बऱ्या-वाईट परिणामांबद्दल अनेक विद्वान संभ्रमात होते. विशेषत: उच्चवर्णीय व मध्यमवर्गीय समजल्या जाणाऱ्या वर्गाने या नव्या आर्थिक धोरणाचे स्वागत केले. शिवाय या धोरणामुळे उच्चवर्गाबरोबरच मध्यमवर्गाची देखील भरभराट झाली. मध्यमवर्ग या

साम्राजवादी जागतिकीकरणाचा एक प्रमुख वाहक बनला. एका बाजूला उच्चवर्ग व मध्यमवर्ग जागतिकीकरणाचा प्रवाहात सामील झाला. मात्र आदिवासी, दलित, भटके विमुक्त व अल्पसंख्यांक हा बहुसंख्य समाज जागतिकीकरणाच्या प्रवाहातून बाहेर फेकला जात आहे. जो या व्यवस्थेशी अनुरुप असेल तोच जगेल किंवा ''बळी तो कान पिळी'' हा आजच्या काळातला प्रमुख मंत्र बनला आहे. कामगार वर्ग खऱ्या अर्थाने बळी ठरत आहे, कारण तो भांडवलशाहीच्या नरड्यावर बसलेला असल्याने भांडवलशाही नष्ट करु शकतो. पण आज कामगार चळवळी अत्यंत क्षीण होऊन कशाबशा तग धरुन आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आदिवासी समाजाच्या विविध चळवळींचा विचार करावा लागेल. विशेषत: आदिवासी संस्कृती व आदिवासी अस्मितेच्या चळवळीपुढे जागतिकीकरणामुळे मोठं आव्हान उभं राहिलेले आहे.

जागतिकीकरण आणि साम्राज्यवादी संस्कृतीच्या आक्रमणाचा एक परिणाम म्हणजे विविध समाज घटकांची वैशिष्टे आणि सांस्कृतिक ओळख संपवून त्यांचे यांत्रिक सार्वत्रिकीकरण केले. वेगवेगळ्या वांशिक प्रादेशिक व भाषिक गटातल्या लोकांमधले आंतरिक लागेबांधे व सांस्कृतिक बंध व नाती तोडून टाकली. विविध समाजाच्या व प्रदेशातील एक वेगळी संस्कृती असलेली व आदिवासी समाजाची ओळख असलेल्या भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. मुख्यत: त्या त्या समाजातल्या नेतृत्वात असलेल्या मध्यमवर्गात हे आधी मोठ्या प्रमाणात घडलं, नंतर हळूहळू त्याचा परिणाम त्या त्या समाज घटकातील इतर खालच्या वर्गावर झाला. अशा ओळख हरवलेल्या आणि विस्कळीत झालेल्या समाजांनी आपली ओळख व अस्मिता शोधण्याची धडपड सुरु केली आणि या पोकळीत शिरुन धर्मांध आणि उच्चवर्गीय मूलतत्त्ववादी व जमातवादी शक्तींनी त्यांना एक धार्मिक ओळख व भ्रामक प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न करुन धर्मांधता आणि विदेशाच्या आधारे इतर धर्मीय समाज घटकांच्या विरोधात उभं केलं. साम्राज्यवादी जागतिकीकरणाचा वाहक बनलेल्या वर्गावर जागतिक पातळीवर एक सार्वत्रिक व समान जागतिक संस्कृती लादण्याचा प्रयत्न सर्व तऱ्हेच्या प्रसार माध्यमांद्वारे केला जात आहे. राष्ट्रीय, प्रादेशिक इ. समूह गटांची वैशिष्टे, संस्कृती आणि परंपरा चिरडून, भाषा नष्ट करुन एक सार्वत्रिक, कृत्रिम व चंगळवादी संस्कृती त्यांच्यावर लादली जात आहे.

आदिवासी धर्माला व सामाजिक, सांस्कृतिक परंपरांना हीन लेखून, मागासलेल्यांना दुय्यम ठरवून त्यांचं हिंदूकरण किंवा ख्रिस्तीकरण करणं, मग यातून पुढे या गटातील उच्च व मध्यमवर्गीय आदिवासींचं जागतिकीकरण पातळीवर होणं ही प्रक्रिया वेगाने घडवली जात आहे. खरं तर गेल्या दीड-दोनशे वर्षात आदिवासी समाजाने इंग्रज वसाहतवादाने बदललेल्या अशा अतिक्रमणाला विरोध करीत आपलं वेगळं अस्तित्व व परंपरा टिकवण्याचा आटोकाट प्रयत्न केल्याचा इतिहास आहे. नागर समाज व नागर समाजात प्रभुत्वात असलेल्या उच्चवर्णीय समाजांनी आदिवासींना दुय्यम स्थान दिलं. मागासलेले, असंस्कृत, रानटी व वनवासी संबोधून आपला धर्म व सांस्कृतिक मूल्ये त्यांच्यावर लादण्याचा जो प्रयत्न केला, त्याला आदिवासींनी विरोधच केला. आदिवासी अस्मितेची व आत्मसन्मानाची चळवळ आदिवासींच्या नागर समाजाशी घडलेल्या विविध पातळ्यांवरील संघर्षातून निर्माण झालेली आहे. आदिवासींना उच्चवर्णीय व

उच्चवर्गीय नागर समाजाकडून सातत्याने नाकारले गेल्याच्या भावनेत अस्मिता चळवळीचं मूळ आहे, हे लक्षात घ्यायला हवं. अस्मिता म्हणजे उच्चदर्जा, प्रतिष्ठा वा सामाजिक उतरंडीत वरचे स्थान मिळण्याची धडपड नव्हे ! तर समानता आणि बरोबरीचं स्थान मिळणं हे या चळवळीचं उद्दिष्ट राहिलं आहे. पण याचबरोबर नागर व बिगर आदिवासी समाजाबद्दल वाटणारे अलगपण आणि सांस्कृतिक दुरभिमानापायी बिगर आदिवासी समाजातल्या आपल्याच आर्थिक स्तरावरील आणि दडपलेल्या कष्टकरी गरीबापासून आदिवासी समाज दुरावलेला राहण्याची शक्यताही वाढते. दुसऱ्या बाजूला बिगर आदिवासी समाजातील कष्टकऱ्यांचा आदिवासी समाजाला वाटणारा परकेपणा यांचाही ऱ्हास होण्याची गरज आहे. त्याशिवाय साम्राज्यवादी जागतिकीकरणाच्या हल्ल्यांना एकजुटीने तोंड देणे शक्य होणार नाही.

आदिवासी संस्कृती जंगलाशी संबंधित राहिली आहे. आदिवासींना जंगलचा राजा म्हणत. जंगलाशीच बांधून ठेवण्याचा प्रयत्न काही पर्यावरणवाद्यांनी चालवला आहे. पर्यावरण संतुलन, पृथ्वीची उष्णता वाढणे इ. पर्यावरणाशी संबंधित गोष्टींसाठी जंगल वाढवणे ही आज सर्व मानवी समाजासाठी गरज ठरली आहे. मात्र आज जागतिकीकरणाच्या काळात आर्थिक रचना वेगाने बदलत असताना जंगलावर आधारित आर्थिक जीवन समग्र आदिवासी समाजावर लादणे योग्य नाही हे एका बाजूला खरे आहे; परंतु बहुसंख्य आदिवासी आज प्रत्यक्षात जंगलाशी संबंधित जीवन जगत आहे. अशा वेळी जंगलावर अतिक्रमण करुन त्यांना त्यांच्या उदरनिर्वाहाच्या साधनांपासून वंचित करण्याची भांडवली विकास नीती रोखणे आवश्यक आहे. त्यासाठी जंगलावर आधारित अर्थव्यवस्था व त्यांच्या विकासाची एक नवी व पर्यायी मांडणी करावी लागेल.

पूर्वापार पध्दतीने दुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासींचे जीवन ढवळून निघाले आहे. त्यांच्यात न्यूनगंड भावना निर्माण होऊन त्यांच्या जीवनातील काही महत्त्वाच्या मानवी मुल्यांचाही ते त्याग करीत आहेत. ही अधोगती कशी थांबवायची हा एक जटील प्रश्न आहे. म्हणून त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक प्रश्न समजून घेणे जरुरीचे आहे. देशाच्या आर्थिक विकासाकरिता राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ आवश्यक असली तरी पुरेशी मात्र निश्चितच नाही. राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढत्या प्रमाणाबरोबर समाजातील दुर्बल घटकांचे जीवनमान जोपर्यंत उंचावणार नाही तोपर्यंत वाढत्या उत्पादनाच्या प्रमाणात अर्थ प्राप्त होणार नाही. विकासासोबत सामान्य माणसांचे राहणीमान, आरोग्य, शैक्षणिक विकास यासह सामाजिक व आर्थिक सेवा सुविधा उपलब्ध होणे, सामूहिक निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग असणे हे झाले तरच खऱ्या अर्थाने विकास झाला असे म्हणता येईल.

आदिवासी समाजाचा इतर बाह्य समाजाशी या ना त्याकारणामुळे संपर्क येऊ लागला. सावकार, श्रीमंत, जमीनदार आर्थिक दृष्टिने संपन्न असल्यामुळे ते अधिक प्रभावित झाले. त्यामुळे रानावनात राहणाऱ्या आदिवासींना या लोकांबद्दल विलक्षण आदर वाटू लागला आणि त्यांच्या बद्दल श्रेष्ठत्त्वाची भावना निर्माण झाली; पण त्याचबरोबर स्वत: त्यांच्या मनात न्यूनंगडांची भावना तयार झाली. आदिवासींच्या सुधारणेसाठी धर्मप्रसारक प्रयत्नशील आहे. त्यामुळे आदिवासी स्वेच्छेने अशा धर्माचा स्वीकार करु लागले. पण ख्रिस्ती धर्मप्रसारकांचा मुख्य हेतू आदिवासींची

सेवा करण्याऐवजी ख्रिस्ती धर्मांतर करण्याचा होता. काही भागात विविध प्रलोभने देऊन ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करण्यास भाग पाडले. परिणामत: आदिवासी भागात काही हिंदू धर्मीय, काही ख्रिश्चन धर्मीय, तर काही परंपरागत जीवन जगणारे असे भेद निर्माण झाले. त्यांच्यात आपापसात द्वेष, मत्सर निर्माण झाले, यामुळे परंपरागत जीवन पद्धती हळूहळू लोप पावत चालली आहे. बाह्य संस्कृतीच्या लोकांशी संबंध आल्याने आदिवासींच्या काही चांगल्या प्रथा लोप पावू लागल्या आहेत. पण त्याचबरोबर बाह्य जगातील काही अनिष्ठ प्रथांचा शिरकाव होऊ लागला आहे. ही चिंतेची बाब आहे. वधूच्या वडीलांकडून हुंडा घेण्याची प्रथा आदिवासी समाजात नाही, पण तो केवळ प्रतिक म्हणून घेतला जात होता. परंतु सुधारलेल्या समाजाच्या संपर्कात आलेले आदिवासी हे वधू मूल्य म्हणून हुंडा मागू लागले आहेत. अशा अनिष्ठ प्रथा पाळण्यासाठी कर्जबाजारी होण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

जागतिकिकरणामुळे नोकऱ्यांचा प्रश्नही अत्यंत बिकट होत चालला आहे. नोकऱ्या मोठ्या प्रमाणावर कुशल, उच्चशिक्षित व तंत्रवैज्ञानिक क्षेत्रातील लोकांसाठीच उपलब्ध होत आहे. त्यामुळे आज आदिवासी समाजापुढे त्यांची आदिवासी म्हणून अस्मिता व संस्कृती जपताना त्यांच्या परंपरेतून स्वाभाविकपणे निर्माण होणारी पण पुढे नेणारी नवी ध्येये, उद्दिष्टे आणि विकासाची कल्पना ठेवली नाही तर अस्मिता जगण्याच्या धडपडीतून रुढ, पारंपरिक व तुटपुंज्या आर्थिक व्यवहारात गुरफटून पडण्याची शक्यता टाळता येणार नाही. म्हणूनच दडपलेल्या इतर कष्टकरी समाजाबरोबर जोडून घेत साम्राज्यवादी भांडवली आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी एकजुटीची व्यापक फळी उभी करण्याच्या प्रक्रियेत आदिवासींना आपल्यातील सामूहिकता व समानता मूल्यांना घेऊन पुढाकारात राहावे लागेल. अशा या सर्व पार्श्वभूमीवर आदिवासी अस्मितेच्या चळवळी आज केवळ आत्मसन्मान व आदिवासी संस्कृती टिकवण्यापुरत्या मर्यादित ठेऊन चालणार नाहीत. राजकीय सत्ता व आदिवासी स्वायत्तता यात तिचं रुपांतर झाल्याशिवाय आदिवासींच्या येत्या काळातील विकासाचा आणि अस्तित्वाचा पर्याय उभा राहणार नाही. म्हणूनच या चळवळी राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा समग्र पातळीवर राबवाव्या लागतील. पण त्याचबरोबर आदिवासी विकासाची नवी रचना कशी असणार व त्यात कुठले वर्ग सत्तेत असणार याचा पर्याय उभा केला नाही तर स्वायत्ततेच्या चळवळी आदिवासींच्या दृष्टीने पूर्णपणे लाभदायक ठरणार नाहीत.

आदिवासींची परंपरा, जीवनशैली, प्रथा व जीवनपद्धती इत्यादींचे संस्कार नवीन पिढीत उतरविण्याचे व त्याचे सातत्य टिकविण्याचे महत्त्वाचे कार्य करणारी यंत्रणा असणे आवश्यक आहे. मात्र अशा पध्दतीचे कार्य करणारी कोणतीही संस्था प्रभावीपणे कार्य करीत नाही. त्यामुळे नृत्य, भाषा, चित्रकला, हस्तकला लोप पावत आहे. यांसारख्या अनेक समस्यांना आदिवासींना सामोरे जावे लागते. आदिवासींची समस्या ही केवळ आर्थिक नसून ती सांस्कृतिक व सामाजिक स्वरुपाची देखील आहे व त्यात अनेक सामाजिक प्रश्न गुंतलेले आहेत.

• • •

महाराष्ट्रातील परधान आदिवासी जमातीचा एक अभ्यास

पाटील धनाजी दत्तात्रय

प्रस्तावना

भारत हा एकतेमध्ये विविधता आणि विविधतेमध्ये एकता असणारा देश आहे. भारतात विविध वंशाचे, जातीचे-जमातीचे, धर्माचे, संस्कृतीचे लोक वेगवेगळ्या भू-प्रदेशात निवास करतात. ऐतिहासिक काळापासून भारत हा परकीयांच्या आक्रमणापासून आजपर्यंत आपली सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि धार्मिक अस्तित्व टिकवून आहे. भारतीय समाजाची विभागणी प्रामुख्याने तीन मुख्य समाजामध्ये झालेली दिसते. नागरी समाज (Urban Society), ग्रामीण समाज (Rural Society) आणि आदिवासी समाज (Tribal Society). नागरी समाज आणि ग्रामीण समाज यापेक्षा आदिवासी समाज आर्थिक, सामाजिक, तंत्रविधात्मक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे.

स्वातंत्र्यपूर्वकाळापासून भारतामध्ये एकूण ४२७ आदिवासी जमातीची नोंद आहे. त्यातील महाराष्ट्रात एकूण ४८ आदिवासी जमाती वेगवेगळ्या प्रदेशात आणि भू-भागात निवास करतात. त्यामध्ये परधान, गोंड, भिल्ल, कोरकू, संथाल, कातकरी, महादेव कोळी इत्यादी. प्रस्तुत लेखामध्ये महाराष्ट्रातील परधान या जमातीचा ऐतिहासिक (Historical), सामाजिक (Social) आणि सांस्कृतिक (Cultural) इत्यादी घटकांच्या अध्ययनावर भर दिला आहे.

परधान ही जमात महाराष्ट्रातील लातूर, नांदेड, गडचिरोली, परभणी, नंदूरबार, ठाणे, अमरावती, नाशिक, नागपूर या जिल्ह्यात आढळून येते.

प्रस्तुत लेखात परधान जमातीची उत्पत्ती, निवास स्थान, दैनंदिन जीवनाची पद्धती, आहार, विवाह पद्धती, श्रद्धा, मांगेतही प्रथा, पारंपरिक सण, मनोरंजन या घटनांचे सखोल विवेचन केले आहे. सदरच्या जमातीची माहिती ही प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम स्वरूपातील साधनांवर आधारित आहे. त्यामुळे प्रस्तुत लेखात जाणीवपूर्वक महाराष्ट्रातील वंचित, उपेक्षित, मागासलेल्या, 'परधान' जमातीचे व्यष्ठी अध्ययन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

परधान जमातीची उत्पत्ती

थोर ब्रिटिश विचारवंत व मानववंशशास्त्रज्ञ जी.एच. हंटन यांनी भारतातील आदिवासी जमातीचा अभ्यास सर्वप्रथम केला आहे. त्यांच्या मते भारतीय आदिवासी हा मूल निवासी आहे. परधान जमातीच्या उत्पत्ती विषयी अनेक मते आहेत ती पुढीलप्रमाणे.

१) जो पराचे म्हणजे दुसऱ्याचे धान्य खातो तो परधान किंवा एका धनाच्या (भात शेताच्या) परावर (बांधावर) जन्मला असा तो परधान होय.

२) गोंड दंथकथेनुसार मूळ गोंड जो सात झाले, त्यातल्या शेवटच्या भावाचे वंशज हे परधान होय. गोंडांची ही एक शाखा असून या राजघराण्यातील प्रधान परधान, पुजारी, घाट हे होत.

३) पाटाडी पाटा (गाणे) परधान म्हणजे गाणे गाणारे भाट, तर पणा म्हणजे पाहुणा परधान होय.

मध्ययुगात हे गोंड राजाच्या दरबारात वंशावळी ठेवण्याचे काम करीत असे. भारताच्या विविध भागात परधान जमात वेगवेगळ्या नावाने ओळखली जाते. देसाई, पठारी, पणाळ, पण, मोकाशी इत्यादी नावाने ही जमात ओळखली जाते. परधानाची धृर्व, भागदीया, कमृ, कृरूरो, अरबी मतकाम इत्यादी कुळं आहेत. परधानाची ज्याप्रमाणे विविध कुळे आहेत त्याप्रमाणे राजपरधान, गोंडापरधान, भोटीया परधान अशी उपकुळेही आहेत.

निवासस्थान / वसतिस्थान

परधान जमातीची वस्तीस्थाने इतर जमातीपासून वेगळी किंवा स्वतंत्र अशी आढळत नाहीत. इतर जमातीसोबत त्यांची घरे आहेत. त्यांच्या घराची रचना ही वनातून मिळणाऱ्या टिकावू लाकूड, गवत, लाल व काळी माती, वेळू, वनस्पतीची पाने व जनावरांचे शेण यांच्यापासून तयार झालेली आहेत. घरामध्ये दोन किंवा क्वचित तीन खोल्या असतात. घराची विभागणी घराच्या मागच्या बाजूस जनावरांचा गोठा असतो. घराच्या समोर लहान मांडव असतो. घराच्या आडव्या बाजूस बांबूवर कपडे सुकवण्यासाठी ठेवतात. घरामध्ये स्वयंपाकासाठी परंपरेपासून चालत आलेली वेगळ्या आकाराची मातीची धातूची भांडी उंचावर ठेवलेली असतात. घरातील जमीन दररोज शेणाने सारवून घेतली जाते. घरच्या सर्व बाजूंना शेण माती व लहान वनस्पतीपासून कुड तयार केलेला असतो. पण सध्या काही घरांवर लोखंडी पत्रे असल्याचे दिसून येते.

आहार पद्धती

परधान ही जमात प्रामुख्याने नागरी समाज व ग्रामीण समाज यांच्यापासून दुर्गम अशा भागामध्ये निवासस्थान करते. त्यामुळे त्यांच्या आहारामध्ये प्रामुख्याने वनामध्ये (वनातून मिळणारी) विविध प्रकाची फळे, बिया, फुले, शिकार यांचा समावेश असतो. पण वनातील खाद्य दररोजच शोधण्याच्या प्रयत्नामध्ये ते पडत नाहीत. त्यामुळे परधान रोजच्या भोजनात भाकरी, डाळी, मिरचीची चटणी, मांस, मासे यांचे सेवन कमी अधिक प्रमाणात करतो. सण व उत्सवाच्या प्रसंगी मेजवानी तयार केली जाते. मद्याप्राशन हे परधान जमातीचे पारंपरिक वैशिष्ट्ये आहे. त्यांच्यामध्ये पुरुष, त्याचबरोबर स्त्रियासुद्धा मध्याचे प्राशन करतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये आहाराच्या पद्धतीवरून भेद आढळून येतात. परधान गोंडाकडे जेवतात; पण गोंड मात्र परधानांच्या घरी जेवण घेत नाहीत कारण परधानान ते आपल्यापेक्षा हीन दर्जाचे मानतात.

परधानांची भाषा, वेशभूषा व अलंकार

आदिवासी जमात ही सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेली जरी असली तरी आपली भाषा, आपली वेशभूषा व अलंकार या गोष्टींना इतर समाजापेक्षा ते अनन्य साधारण असे महत्त्व देतात. परधान जमातीची स्वतंत्र अशी बोलीभाषा नसून गोंड जमातीचीच ती बोलीभाषा आहे. वर्तमानकाळामध्ये दैनंदिन जीवनातील गरजा भागविण्यासाठी परधान ही जमात आधुनिक जगाच्या संपर्कात असल्याने त्यांच्यामध्ये मराठी, हिंदी, तेलगू भाषेचेही ज्ञान आहे. परधानाच्या मुलांना लहानपणापासूनच मराठी, हिंदी व इंग्रजीचे शिक्षण दिले जाते. सध्या परधान पारंपरिक वेशभूषा अपवादानेच नजरेस येते. सण, उत्सव व पारंपरिक कार्याच्या दिवशीच परधान तो वेश परिधान करतात. एरव्ही ते सर्वसामान्य लोकांप्रमाणे पँट शर्ट,

स्त्रीया साडी, चोळी, लुगडे परिधान करतात. परधान जमातीमध्ये अलंकारांना अनन्य साधारण महत्त्व आहे. कैथील, ॲल्युमिनिअम, तांबे, चांदी, सोने त्यापासून तयार केलेले अलंकार ते आवडीने परिधान करतात. परधान स्त्रिया अंगावरती गोंदवून घेतात. पुरुष मात्र गोंदवून घेत नाहीत. लहान मुलांसाठी वेगळा पोशाख व अन्य अलंकारांचा वापर करतात.

विवाह पद्धत

अन्य जमातीप्रमाणेच परधान जमातीमध्ये विवाह पद्धतीस महत्त्वाचे स्थान आहे. परधान जमातीस वैवाहिक वयोगट निश्चित दिसून येत नाही. सामान्यत: मुलगा/मुलगी वयात आल्यावर त्यांचे लग्न पारंपरिक पद्धतीने लावले जाते. अन्य समाजाप्रमाणे परधान जमातीमध्ये हुंड्याची प्रथा अस्तित्वात आहे. पण हा हुंडा वर पक्षाकडून वधू पक्षाला दिला जातो. त्यास 'देज पद्धत' असे संबोधले जाते. या प्रथेमध्ये डाळ, भात, मीठ, दारू, साड्या, कपडे, रोख रकमेचा समावेश असतो. ज्या वरामध्ये वधुपक्षास हुंडा देण्याची ऐपत नाही त्यास मुलीच्या घरी काही वर्षे लग्नाअगोदर काम करावे लागते. परधानांची लग्न विधी वैशिष्ट्यपूर्ण असतो. लग्नाची विधी ही प्रामुख्याने वधुच्या घरी पार पाडला जाते. त्यामध्ये पारंपरिक हत्यारे (खंजीर) आणि घोंगडी यांचा समावेश होतो. परधान जमातीमध्ये आंतरविवाहास महत्त्वाचे स्थान आहे. जमातीबाहेर विवाहास जातपंचात विरोध करते. क्वचितप्रसंगी जमातीमध्ये घटस्फोटाचे प्रमाण आढळते.

श्रद्धा व धार्मिक परंपरा

महाराष्ट्रातील परधान जमातीच्या देव-देवता या वेगळ्या स्वरूपाच्या आहेत. ते नैसर्गिक घटकांची पूजा करतात. भगवान व बडोपन हे त्याचे प्रमुख देव आहेत. बडा देव, बुढापेन, बुड्डादेव अशी नावे आहेत. वनातील सजा नावाच्या वृक्षावर तो राहतो अशी त्यांची श्रद्धा आहे. पराधान हनुमान, मरीआई, पोचम्ना, जंगुबाई, भवानी, महादेव, काली आदी देवी देवतांची श्रद्धेने आराधना करतो. इतर जमातीपेक्षा परधानांत धार्मिक वृत्ती अधिक प्रमाणात दिसून येते. काही वृद्ध व्यक्ती सकाळी बना या वाद्यावर धार्मिक गीत गातात. देवी देवता माणसांचे कल्याण व संहार करतात अशी त्यांची धारणा आहे. देवी देवतांना प्रसन्न ठेवण्यासाठी पशुबळी देखील दिला जातो.

पारंपरिक सण व उत्सव

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. देशामध्ये विविध जाती, जमातीचे व धर्माचे लोक वास्तव्य करतात. परधान जमात त्यास अपवाद नाही. विविध सण उत्सवाच्या माध्यमातून ते आयुष्याचा आनंद घेताना दिसतात. एकती उत्सव, नवा उत्सव, घरेली उत्सव आणि मरहाई जत्रा असे विविध पारंपरिक सण व उत्सव होतात. परधान इतर जाती जमातीच्या संपर्कात असल्यामुळे आपल्या पारंपरिक सण व उत्सवाबरोबरच ते दिपावली, दसरा, महाशिवरात्री, गुढीपाडवा, मकरसंक्रांत, दसरा, शिमगा, पोळा व गणपती असे वेगवेगळे सण साजरे करतात.

हस्तकला व मनोरंजन

महाराष्ट्रातील परधान जमातीत विविध प्रकारचे कला गुण आहेत. जमातीतील प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या तरी कलेमध्ये निपुण असते. त्याची कला वनातून मिळणाऱ्या साधनांवर आधारित असते. सागाच्या लाकडावरील कला, मातीची नक्षीदार भांडी, मातीकाम, हस्तकला, विणकाम, बांबूपासून विविध वस्तूंची निर्मिती ते करतात. या शिवाय गायन, नृत्य

व वादन हे कलागुण सुद्धा नांदेड जिल्ह्यातील परधानांत आढळतात.

मार्तिक विधी

ज्या पद्धतीने हिंदू धर्मात व्यक्तीच्या जीवनात सोळा संस्कारांना महत्त्व आहे. त्याच पद्धतीने परधान जमातीत मार्तिक प्रथेचा संबंध व्यक्तीच्या अंत्यविधीशी आहे. माणूस आसनमरण होतो तेव्हा सर्व नाते-वाईक त्याच्याभोवती जमतात. एक रुपया व दही त्याच्या तोंडात घालतात व ते गिळायला लावतात. मृत्यूनंतर सर्व लोक शोकगीत म्हणतात. घरची परिस्थिती गरीब असल्यास प्रेत पुरतात. ते पुरण्याअगोदर खड्ड्याभोवती तीनदा फिरवतात. गावातील सर्व लोक मार्तीकाला येताना सिवला झाडाच्या डाहाळ्या आणतात आणि थडग्यात टाकतात. परधान जमातीत सुवासनी स्त्रीचे निधन झाल्यास अंत्यविधी करण्याची वेगळी पद्धत आहे. तिच्या प्रेताला नवीन लुगडे नेसवतात. कपाळावर कुंकू लावतात, तिच्या पदरात ज्वारीचे पीठ, नाणी, तुरीची डाळ व ज्वारीची भाकर बांधून पानाचा विडा ठेवतात आणि संपूर्ण कुटुंबात तीन दिवस सुतक पाळतात. परधान जमातीचा पुनर्जन्म प्रथेवर विश्वास असल्याचे दिसून येते.

समारोप

महाराष्ट्रातील परधान जमातीचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन वैशिष्ट्यपूर्ण आहे. वरील अध्ययनावरून असा सर्वसामान्य निष्कर्ष निघतो की, परधानांच्या व्युत्पत्तीवरून कोणत्याही जमातीची, जातीची व्युत्पत्ती योग्य आणि परिपूर्ण नाही. परधान व गोंड जमातीचा जवळचा संबंध आहे. परधानांना विविध नावाने व उपनावाने संबोधले जाते. त्यांच्यात देखील इतर जाती-जमातीप्रमाणे पोट जमाती दिसून येतात. महाराष्ट्रातील परधान जमातीची बोलीभाषा, वेशभूषा, अलंकार, निवास व्यवस्था, खान-पान पद्धती, विवाह पद्धती, विविध देवी-देवता, परंपरागत सण-उत्सव यांच्यातील उपजात कलागुण, अंत्यविधी, मार्तीक प्रथा ह्या सर्व घटकामध्ये त्यांचे वेगळेपण सामावलेले आहे. वर्तमानकाळातील विविध घटकांच्या प्रभावामुळे परधानांच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर परिणाम होत आहे. आधुनिक काळात इतर प्रगत समाजाच्या संपर्कात आल्यामुळे त्यांच्या सांस्कृतिक कलागुणांचा ऱ्हास होत आहे.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात महाराष्ट्रातील आदिवासी, अस्पृश्य, दलित समाज मध्ययुगातच वावरत असल्याचे दिसते. शासकीय उपक्रमाच्या माध्यमातून विकासकामे होत असली तरी अपेक्षेप्रमाणे विकास झालेला नाही. आदिवासी मुला-मुलींमध्ये कुपोषण, निरक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. परधान जमातीत कर्जबाजारीपणा, अंधश्रद्धा, हुंडापद्धती आजही दिसून येतात. सरकारने आदिवासी भागात नवीन उद्योगधंदे, शिक्षणसंस्था, शासकीय योजनांच्या माध्यमातून आदिवासी जमातीचे विकास घडवून आणावेत.

• • •

पाटील धनाजी दत्तात्रय
समाजशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
पिन कोड - ४१६ ००४.
मोबाईल : ९१-९५६१७०१५४८

आदिवासी एक निसर्गमय मानव

डॉ. मोतीराम रावजी देशमुख

आदिवासी आणि निसर्ग यांच्यात पूर्वपार अतूट संबंध आहे. प्राचीन काळापासून ते डोंगरदऱ्यांत आणि जंगलाच्या आश्रयाने राहात आहेत. आजही त्यांचे वनाशी घट्ट नाते आहे. त्यामुळेच आदिवासी आणि वनवासी असे समीकरण तयार झाले आहे. वनवासी म्हणजे वनात राहणारे, वनांशी एकरुप झालेले, वनाला सर्वस्व मानणारे भारतभूमीवर निरतिशय प्रेम करणारे आणि मातृभूमीविषयी असीम श्रध्दा बाळगणाऱ्या या आदिवासींना काही जण वनवासी म्हणतात. ही संज्ञा आदिवासींचे वनाशी असलेल्या घट्ट नात्याचे दर्शक आहे.

रामाप्रमाणे वनवासाला पाठविलेल्या जमाती असा वनवासी या संज्ञेचा अर्थ मुळीच नाही. सखल भूप्रदेश, नगरात राहणाऱ्या जाती-जमातीपेक्षा या आदिवासींची निसर्गाच्या सानिध्यात असणारी जीवन रहाटी, संस्कृती वेगळी आहे.

आदिवासी हे स्वत:ला वनापासून आणि निसर्गापासून वेगळे समजत नाहीत. वनाशी आणि निसर्गाशी एकरुप असे जीवन ते जगतात. निसर्गाचेच एक घटक म्हणून राहातात. वन आणि तेथे राहणारे आदिवासी यांचे नाते परस्परावलंबी आणि परस्पराश्रयी आहे. कोकणा, वारली, कातकरी, महादेव कोळी आदी आदिवासी जमातीचे लोक आजही जंगलातील पालेभाज्या व फळभाज्या आवडीने आहारात वापरतात. झाडपाला, कंदमुळे ते खातात. लग्न सोहळा, सण-उत्सव, तमाशा, भोवाडा याप्रसंगी होणाऱ्या नकला, नाचगाण्यात पुरुष डोळे, कमरेभोवनी झाडपाला गुंडाळून तर महिला रंगीबेरंगी फुलांच्या माळा, हाडे, गवत, लाकडाच्या मण्यांपासून तयार केलेल्या माळा, विविध पक्षांची पिसे डोक्याला लावून नाचगाणी करतात.

आजारी पडल्यानंतर दवाखान्यातील डॉक्टरांनी दिलेल्या गोळ्या-औषधांपेक्षा त्यांचा वैदू-भगत पुजाऱ्याने दिलेली जडीबुट्टी ते श्रध्दापूर्वक आणि विश्वासाने खातात/पितात. या औषधांचा हमखासपणे गुण येतो यावर त्यांचा विश्वास आहे. तशी त्यांची धारणा आहे. घरासमोर आजही ते आवडीने एकतरी फुलझाड, फळझाड लावतात. निसर्गाच्या सान्निध्यात सर्वाधिक वेळ राहणे ते पसंत करतात. निसर्गाशी असलेली एकरुपता यातून लक्षात येते.

थोडक्यात वनाशी, निसर्गाशी आदिवासी जमातीचे लोक इतके एकरुप झालेले आहेत की, त्याच्याशिवाय जणू त्यांचे अस्तित्वच संभवत नाही. निसर्ग, पर्यावरणाशी असलेल्या एकजीव एकरुपतेमुळेच त्यांची एकूण जीवनशैली आणि संस्कृती ही नद्यांच्या खोऱ्यात तसेच सुपीक भूपदेशात राहणाऱ्या ग्रामीण, नागरी भागापेक्षा निश्चितपणे वेगळी आहे. हे नव्याने सांगायला नको.

वर नमूद आदिवासी जमातींमध्ये प्रचलित असलेल्या कणसरी कथा, डोंगरीदेव कथा, बडादेव कथा, ब्रम्हदेव कथा, डहाक कथा, थाळगाणे कथा आदी लोककथा तसेच उदाहरणांदाखल खाली नमूद

काही लोकगीतांवरुन आदिवासी आणि निसर्ग यांच्यातील संबंध उलगडण्यास नक्कीच मदत होते.

पिपळावानी खळाळजो,
हारळीवानी येली जायजो,
कापसावानी ढवळा हायजो,
शिदाचा डाहाळा कमरल खासजो,
सरकार करजो, दरबार करजो,
खोटा पैसा चालवजो नोको

आदिवासी जमातींमध्ये इतरांप्रमाणेच संस्कारांना महत्व आहे. इतर संस्कारांपैकी जावूळ (जावळ) हा एक महत्वाचा संस्कार. कोकणा, वारली जमातीत सुईन सकाळीच बाळाला न्हाऊ घालते. मामा बाळाच्या डोक्यावरचे पहिले केस काढतो. बाळाला नवीन कपडे घातले जातात. पिंपळाची पाने, हरळी आणि कापूस यांपासून तयार केलेली टोपी बाळाला घातली जाते. बाळाची विधीवत पूजा केली जाते. यावेळी सुईन काश्य/पितळाचे ताटावर नाण्याने (रुपया) नाद करीत वरील गीत गाते.

खळाळणाऱ्या पिंपळाप्रमाणे हसत, आनंदाने जीवन जग, हरळी घट्टपणे सर्वत्र पसरते तसा तू आपलय कामाने/गुणाने नाव उज्वल कर. आणि कापसासारख्या पांढऱ्या फट्ट होईपर्यंत जग म्हणजेच दीर्घायुष्य लाभो असा शुभाशीर्वाद सुईन यावेळी देते. बालकाला निसर्गाकडून, वनस्पतींकडून घ्यावयाचे चांगले गुण/मुल्यांची शिकवण यावेळी ती देते. अन्य जमातींमध्ये असे संस्कार, मूल्यांचे धडे बालपणीच मूलांना क्वचितच दिले जात असतील. आदिवासींचे जीवनात निसर्गाला असलेले महत्त्वाची प्रचिती या लोकगीतावरुन येते.

लिंबा तुजे झाडावर, कावळा बोल काई,
चिमणीस बोल बाई, सासरा आला काई.

घरासमोर येऊन कावळा विशिष्ट आवाजात ओरडला की, पाहुणे येणार असा समज काही आदिवासी जमातींमध्ये रुढ आहे. कावळ्याचा विशिष्ट आवाज हा पाहुणे येण्याचा संकेत ते आजही मानतात.

दारी आहे ताड वं माड, तेवर चड गोरी वं नार,
काय वं गोरी चडलीस, मी त पाहां मुराळी वाट.

वर्षातील विशिष्ट सण, उत्सव, यात्रा, एखादा कार्यक्रम असला की, सासुरवाशीण माहेरी जाण्यास उतावीळ होते. तिचे संपूर्ण लक्ष माहेरच्या वाटेकडे मुराळी येणाऱ्या माणसाकडे लागलेले असते. माहेरी जाण्यासाठी उतावीळ झालेली एक तरुणी चक्क माडांच्या झाडावर चढून माहेरच्या माणसांचा ठाव घेते.

सावर फुलली, वारेनी डुळली,
उषा तुजा पेनं भरला,
माजा आनंद, आईचे डोळ्यात पाणी.

सावर नावाच्या झाडाचा बहराचा हंगाम आणि कोकणा जमातींचा पेनं (मागण) लग्न यांच्या धुमधडाक्याचा हंगाम एकच सावरीचा बहर व पेन, लग्न या संस्कार सोहळ्याचा हंगाम या निसर्गचक्रातील घटनांची येथे घातलेली सांगड मोठी मार्मिक आहे.

रामदास जावू नको रे आजूबाजू,
डोंगरी लावलेत काजू

शासकीय फळबाग लागवड योजनेचा लाभ गेल्या दशकापासून आदिवासी घेऊ लागलेत. विविध फळझाडांपैकी काजू झाडाची लागवड आदिवासी करु लागलेत याचा प्रयत्न या लोकगीतावरुन येतो.

वर उदाहरणादाखल दिलेल्या नमुनेदार लोकगीतांवरुन आदिवासी आणि निसर्ग यांच्यातील

संबंध ध्यानात येण्यास मदत होते.

'आदिवासींनीच जंगले संपविली' असा आरोप सध्या त्यांच्यावर इतरांकडून केला जातो आहे; परंतु तो चुकीचा आहे. जंगलांच्या माहिती विषयी अभ्यासक के . जैन म्हणतात, ''वने मातृदेवतेची निवासस्थाने मानली जातात. मी देवभूमी असते. अशा समजुती परंपरेने चालत आलेल्या आहेत. त्यामुळेच ते वनांना पवित्र मानतात. त्यांना हानी पोहचविण्याला ते पाप समजतात. मानवाच्या शिकारी अवस्थेपासून या वनांचे पवित्र वने म्हणून संरक्षण, संवर्धन झाले आहे. पूर्वेत्तर भारतातील गारो आणि खासी या आदिवासी जमातींचे लोक त्यांच्या पवित्र मानल्या गेलेल्या वनात कुणालाही प्रवेश करु देत नाहीत. हानी पोहचविणे तर दूरच तेथील पशूपक्षांची हत्या देखील करु देत नाही. मध्य प्रदेशातील गोंड वृक्ष तोडीला गुन्हा मानतात. वृक्ष तोडणे त्यांच्या दृष्टीने पापकृत्य असते. जैन यांच्या या भनावरुन देशातील विविध आदिवासी जमातींमध्ये जंगल तसेच पशूपक्षांना असलेले महत्त्वच यातून स्पष्ट होते.

महाराष्ट्रातील कोकणा आणि वारली जमातीत पिंपळ, पायर, पळस, वड, कविसा, सावर, उंबर शीद (शमी), बेल इत्यादी देववृक्ष समजली जाणारी झाडे ते राखून ठेवतात. या आणि इतर फळझाडांवर त्यांची उपजिवीका चालते. तसेच 'वनौषधी' झाडाझुडपांवर त्यांचे दीर्घायुच अवलंबून असल्याने ते अशा झाडांची तोड करीत नाहीत; की त्याचे लाकूड सुध्दा चुलीत लावत नाहीत.

'वाघदेव' ही 'कोकणा' जमातीची रक्षकदेवता आहे. वाघदेव ज्या परिसरात असतो त्या परिसरातील झाडे, झुडपे तोडू नये असा संकेत या जमातीमध्ये आहे. आणि ते तो पाळतात. त्यामुळेच 'वाघदेवाच्या' परिसरात अगदी दाट जंगल (झाडी) बघायला मिळते. प्राणीपूजा व निसर्गपूजा या आदिवासींच्या पारंपरिक सांस्कृतिक जिवनाचे अंग आहेत. आदिवासींच्या समजुती त्यांच्यात प्रचलित असलेल्या रुढी आणि त्यांचे परंपरेने चालत आलेले आचार यांचे स्वरुप पाहिले तर झाडे, पशूपक्षी, नद्या, तळी, डोंगर इत्यादी संबंधी त्यांच्या मनात वसलेल्या श्रध्दा भावांचे दर्शन घडते. त्यामुळेच ते त्या ठेवनिर्मित वनांतील वृक्षांना आपल्याकडून इजा पोहचू नये याची दक्षता येतात. आदिवासांच्या वनांविषयांच्या या भूमिकेमुळेच आजही वने टिकून आहेत.

अलिकडच्या काळात जागतिक पातळीवर पर्यटनाला महत्व येत आहे. वनक्षेत्रात दळणवळणांची साधणे, पंचतारांकित हॉटेल, बांधकाम, धरण, व्यापार, उद्योगधंदे या भागात वाढू लागल्याने आदिवासींचे जीवन आणि वनक्षेत्रावरही विपरीत परिणाम होत आहे. आदिवासी आणि निसर्ग यांची ताटातूट करुन त्यांचे भावजीवन आणि कलाजीवन प्रदूषित करण्याचे प्रयत्न सध्या सर्वत्र होत आहेत. यामुळेच त्यांची ग्रामसंस्कृती नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. शिवाय प्रदुषणमुक्त असलेल्या या भागात 'प्रदूषणाचा' प्रश्न निर्माण होऊ पाहतो आहे.

डोंगरदऱ्यांतील निसर्गाच्या आश्रयाने राहणाऱ्या आदिवासींचे जीवन नागरी आणि शहरी कृत्रिमतेपासून दूर असून बंधनरहित आहे. मर्यादित गरजांमुळे त्यांच्या जीवनात धावपळ नाही. सभोवताली हिरवीगार झाडी, डोक्यावर निळे आकाश आणि खळखळणारे झरे यांच्या सहवासात राहणारी ही साधीभोळी माणसं, खेड्यापाड्यांवर, वाड्यावस्त्यांवर लहानमोठ्या समूहाने राहात असली तरी त्यांचे परस्परांशी घट्ट

असे भावनिक नाते असते. जोराच्या वाऱ्याने गदगदून हालविल्यानंतर झाड जसे पूर्वीपेक्षा अधिक आल्हाददायक नि टवटवीत दिसते तसेच गहिऱ्या भावबंधांनी घट्ट बांधलेली ही माणसे हातात हात घालून खळखळून समूह जीवन जगतात. व्यक्तिकेंद्रीतता त्यांच्यात नसते. शिवाय शहरी जीवनासारख्या बेगडीपणा तेथे नसतो नि स्वार्थाचा वासदेखील !

बदलती शेती करणाऱ्या कोकणा, वारली, कातकरी, महादेव कोळी या जमाती गेल्या काही पिढ्यांपासून स्थिरावल्या आहेत. पूर्वी शिकार, कंदमुळे, फुलेफळे, झाडपाला यावर गुजराण करणारा सावरीची कात आणि गंतुरीच्या पान विड्याने तोंड रंगवणारे हे आदिवासी अलीकडे काजू, हापूस आंब्याची लागवड करु लागले आहेत. नागली, भाताच्या शेती बरोबर ऊस, भूईमुग, टमाटे, कांदा ही नगदी पिके घेऊ लागले आहेत. शासनाने पशुपक्षी हत्त्यवर बंदी घातल्याने हरिण, ससा, भेकर, साळींदर, रानडुक्कर, मोरगी, ससाणा, मोर इत्यादी पशुपक्षांची समूहाने शिकार करुन पोटाची भूक भागविणाऱ्या या उपजिविकेच्या साधनांवर यामुळे कायद्याची बंधने आली आहेत.

परंतु असे असले तरी दिवसेंदिवस वनौषधी वनस्पती, झाडे आणि पशूपक्षी यांच्या घटण्याच्या संख्येमुळे इतरांप्रमाणेच 'जंगलचा हा राजाही' चिंतेत आहे. या जाणीवेमुळेच तो या साऱ्यांच्या संरक्षण व संवर्धनासाठी गावपातळीवर 'कुऱ्हाडबंदी, पशूपक्षी हत्याबंदी' या सारखे अभिनव उपक्रम स्वत: पुढाकार घेऊन राबवू लागला आहे. पाण्याशिवाय मासा जिवंत राहू शकत नाही, हे अलीकडच्या काळात खऱ्या अर्थाने उमगल्यानेच नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, पेठ, दिंडोरी, कळवण, त्र्यंबकेश्वर तालुक्यातील काही गावकऱ्यांनी आपले कर्तव्य समजून असे उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे.

मात्र एकट्यादुकट्याचे हे काम नाही. 'एक मूल एक झाड, कुऱ्हाडबंदी, जंगल वाचवाल तर मानवी जीवन वाचवाल' या अभियानात प्रत्येकानेच आपले कर्तव्य समजून भाग घ्यायला हवा. उघड्या-बोडक्या झालेल्या, बनू पाहणाऱ्या टेकड्या, डोंगराप्रमाणे हा देश उघडा नागडा होण्यास फारसा अवधी लागणार नाही. आज पैसा आणि सुखाच्या मागे धावणाऱ्या सुजानांनी एक सत्य ध्यानात घ्यायला हवे. या देशाची पवित्र संस्कृती ही जंगलावून जन्माला आली, तेथेच विकसीत झाली आणि जंगलाच्या आश्रयानेच स्थिरवलेली आहे. जंगलाच्या आश्रयामुळे ती जिवंत आहे. आजच्या या हपापलेल्या जमान्यात जंगला बरोबर संस्कृती लोप पावली तर, एकूणच मानवी जीवन शुष्क बनेल ! हे सुजाणांस नव्याने सांगायला नको ! म्हणूनच काळाची पावले ओळखून प्रत्येकानेच आपले कर्तव्य समजून निसर्गमय आदिवासी प्रमाणेच निसर्गावर प्रेम करायला हवे, त्यांचे संरक्षण, आणि संवर्धन करायला हवे. यातच अवघ्या मानव जातीचे कल्याण सामावलेले आहे हे आपण विसरता कामा नये.

• • •



आदिवासींचे कैवारी – खंडेराव सावे

डॉ. जयंतराव पाटील
माजी सदस्य, योजना आयोग भारत सरकार

कै. खंडेराव सावे ह्यांनी २५ वर्षांहूनही अधिक काळ ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या शोषणामुक्तीचे व समाज कल्याणाचे कार्य केले आहे.

श्री. खंडेराव सावे ह्यांचा जन्म ठाणे जिल्ह्यातील बोर्डी ह्या गावी २५ सप्टेंबर १९०९ रोजी एका शेतकरी कुटुंबांत झाला. त्यांचे शालेय शिक्षण बोर्डी येथे थोर सर्वोदय सेवक आचार्य भिसे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. आचार्य भिसे ह्यांनी त्यांचे सारे जीवन आदिवासींच्या सेवेसाठी समर्पित केले होते. श्री. खंडेराव सावे ह्यांना आदिवासी सेवेची प्रेरणा आचार्य भिसे ह्यांचेकडूनच प्राप्त झाली.

श्री. खंडेराव सावे ह्यांचे महाविद्यालयीन शिक्षण मुंबईच्या विल्सन महाविद्यालयात झाले. तेथून त्यांनी मुंबई विद्यापीठाची बी. ए. ही परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांनी ठाणे जिल्ह्यातील वारली ह्या आदिवासी समाजावर संशोधन करुन त्यावर आधारित ''द वारलीज'' हा प्रबंध लिहिला. त्याबद्दल मुंबई विद्यापीठाने त्यांना समाजशास्त्र ह्या विषयांत एम. ए. ही पदवी प्रदान केली. मुंबई विद्यापीठाची एल. एल.बी. ही पदवी संपादन केली. श्री. सावे ह्यांनी ''द वारलीज'' हा आपला प्रबंध पुस्तक रुपाने प्रसिद्ध केला आहे. हे पुस्तक आदिवासी साहित्यात संदर्भ ग्रंथ म्हणून मानले जाते. हे पुस्तक पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) ह्या संस्थेने प्रकाशित केले आहे. श्री. सावे ह्यांनी भारतातील अनेक आदिवासी जमातींवर संशोधन केले असून त्यासंबंधीचे शास्त्रीय प्रबंध त्यांनी प्रसिद्ध केले आहेत.

श्री. खंडेराव सावे ह्यांची १९३२ साली त्या वेळच्या मुंबई राज्यात सहाय्यक मागासवर्गीय अधिकारी ह्या पदावर नियुक्ती झाली. त्याकाळी आदिवासी कल्याण हा विषय मागासवर्गीय विभागाकडे होता. श्री. सावे हे ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागात फिरत असताना त्यांना असे दिसून आले की हे आदिवासी अत्यंत गरिबीचे जीवन जगत आहेत. त्याचे मुख्य कारण त्यांच्यात असलेले अज्ञान हे आहे. शिवाय जमीनदार, सावकार व जंगल ठेकेदार ह्यांचेकडून त्यांचे मोठे शोषण चालले आहे.

श्री. सावे ह्यांनी सर्वप्रथम शोषणमुक्तीला प्राधान्य दिले. जमीनदार आदिवासींना कुळ म्हणून राबवीत असत व त्यांच्याकडून जबर खंड वसूल करीत. त्यांच्या लहरीप्रमाणे ते आदिवासी कुळांना जमीन सोडावयास लावीत. श्री. सावे ह्यांनी १९३८ सालच्या कुळकायद्याचा आधार घेवून त्याची योग्य अंमलबजावणी केली व कुळांना 'संरक्षित कुळे' म्हणून हक्क प्राप्त करुन दिले. पुढे १९५१ साली 'कसेल त्याची जमीन' हा कायदा पास झाला व आदिवासी आपल्या जमिनीचे मालक बनले. ह्याचे मोठे श्रेय श्री. खंडेराव सावे यांना आहे.

ठाणे जिल्ह्यातील सावकार आदिवासींना जी कर्जे देत त्यावर भारी व्याजदर लावीत असत. ही कर्जे फेडण्यासाठी आदिवासींना सावकाराकडे मोलमजुरी करावी लागे. मजुरीचे दर फार कमी असत. अशा मजुरांना वेठबिगार म्हणत असत. अनेक वर्षे वेठबिगार म्हणून काम केल्यानंतरही त्यांचे कर्ज फिटत नसे. हे थांबविण्यासाठी श्री खंडेराव सावे ह्यांनी सावकार नियंत्रण कायद्याचा वापर केला व वेठबिगारी पद्धती बंद केली.

ठाणे जिल्ह्यातील सावकार 'पालेमोड' पद्धतीचा अवलंब करीत. धान्य लागवडीच्या हंगामात आदिवासीकडे अन्नधान्य उपलब्ध नसे. अशावेळी ते सावकाराकडून उसनवारीने धान्य घेत. भात पिकल्यानंतर उसनवारीने घेतलेले धान्य दुपटीने किंवा तिपटीने परत करावे लागे. ही पद्धती बंद करण्यासाठी श्री. सावे ह्यांनी अनेक सावकारांवर खटले भरले. तसेच आदिवासींसाठी धान्याची खावटी कोठारे सुरु केली. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील पालेमोड पद्धती बंद झाली.

ठाणे जिल्ह्यात वनांचे क्षेत्र मोठे आहे. ह्या क्षेत्रात झाडे तोडणे, लाकडावर प्रक्रिया करणे, लाकडांची वाहतूक करणे ही कामे आदिवासी मजूर करीत असत. जंगल ठेकेदार ह्या मजुरांना फार थोडी मजुरी देऊन ही कामे करीत असत. जे आदिवासी ह्या शोषणाला प्रतिकार करीत त्यांना जंगल ठेकेदार मारहाण करीत. काहीवेळा तर हे ठेकेदार आदिवासी मजुरांना कोळशाच्या भट्टीत जिवंत जाळून टाकीत. ठाणे जिल्ह्यांतील जंगल ठेकेदारानी आदिवासी मजुरावर केलेले पाशवी अत्याचार भारतात इतरत्र क्वचितच पहावयास मिळतील.

श्री. खंडेराव सावे ह्यांनी या अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्यास आदिवासींना संघटित केले. आपला जीव धोक्यात घालून ते जंगलांतील कुपांना भेट देत असत व आदिवासींना योग्य मजुरी दिली जात आहे का ते पहात असत. अनेक जंगल ठेकेदारांवर त्यांनी खटले भरले. त्यामुळेच जंगल ठेकेदारांची दहशत कमी झाली. अशारीतीने श्री. खंडेराव सावे ह्यांनी ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या शोषणमुक्तीद्वारे अन्याय निवारणाचे बहुमोल कार्य केले आहे.

श्री. खंडेराव सावे ह्यांनी शिक्षण, आरोग्य व कृषी या क्षेत्रात आदिवासी कल्याणाचे कार्य केले आहे.

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागात शिक्षणाच्या कोणत्याच सोयी उपलब्ध नसल्याने आदिवासींत निरक्षरतेचे प्रमाण फार मोठे होते. स्वातंत्र प्राप्तीनंतर शासनाने एक शिक्षकी शाळा स्थापन केल्या. श्री. सावे ह्यांनी या एक शिक्षकी शाळा आदिवासी भागात लोकप्रिय व्हाव्यात म्हणून दीर्घकाळ प्रयत्न केले. त्यासाठी ते आदिवासींची शिबीरे घेत असत व पालकांना आपली मुले शाळेत पाठवावी, असे आवाहन करीत. त्यांच्या या आवाहनाला आदिवासींनी उत्तम प्रतिसाद दिला, म्हणून या एक शिक्षकी शाळा लोकप्रिय झाल्या व आदिवासींची पहिली शिकलेली पिढी तयार झाली. आदिवासी पिण्याचे पाणी नदी-नाल्यांतून घेत असत. अनेक वेळा हे पाणी दूषित झालेले असे. त्यामुळे त्यांना आजार व साथीचे रोग होत. श्री. खंडेराव सावे यांनी त्यासाठी पिण्याच्या पाण्याच्या विहिरी खणण्याचा कार्यक्रम हाती घेतला. लोकांचे श्रमदान व शासकीय अनुदान ह्यांद्वारे ठाणे जिल्ह्यात शेकडो विहिरी त्यांनी तयार केल्या. त्यामुळे

आदिवासींना पिण्याचे शुद्ध पाणी मिळू लागले व त्यांचे आरोग्य सुधारले.

ठाणे जिल्ह्यातील आदिवासींत उपासमार व कुपोषण या दोन समस्या होत्या. त्याचे कारण आदिवासी परंपरागत शेतीच्या जुन्या पद्धतीचा अवलंब करतात हे होय. श्री. खंडेराव सावे यांनी त्यासाठी आदिवासी शेतकऱ्यांची शिबिरे आयोजित केली व त्यांना सुधारले बियाणे, खते व कीटकनाशके ह्यांचे प्रात्यक्षिक शिक्षण दिले. या शिबिरात कृषि विभागाचे अधिकारी मार्गदर्शन करीत असत. आदिवासी शेतकऱ्यांना बियाणे, खते व कीटकनाशके सवलतीच्या दराने पुरविली जात. त्यामुळे आदिवासींनी भाताची सुधारीत पद्धतीने लागवड केली व त्यांचे उत्पादन वाढले व त्याच्यांत असलेली उपासमार व कुपोषण दूर झाले.

श्री खंडेराव सावे यांनी आदिवासी युवकांसाठी संस्कार शिबिरे आयोजित केली. या शिबिरांत आदिवासी समाजातील चालीरीती, समाज सुधारणा, आदिवासींच्या शोषणमुक्तीसाठी केलेले कायदे, आदिवासी कल्याणाच्या योजना यांची माहिती दिली जाई. श्री. सावे स्वत: या शिबिरात मार्गदर्शन करीत. या शिबिरांमुळे आदिवासी युवकांत विधायक नेतृत्व निर्माण झाले.



श्री. खंडेराव सावे ह्यांनी प्रशासनात राहून आदिवासींच्या शोषणमुक्तीचे व आदिवासी कल्याणाचे जे कार्य केले त्याची नोंद महाराष्ट्र शासन व भारत सरकारने घेतली व त्यांना भारतीय प्रशासन सेवा (आय.ए.एस.) हा किताब प्रदान करण्यात आला.

श्री. खंडेराव सावे ह्यांनी अनेक उच्च पदावर काम केले आहे. त्यात महाराष्ट्र राज्याचे समाज कल्याण संचालक, रत्नागिरी व उस्मानाबाद जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व महाराष्ट्र शासनाच्या उद्योग व शिक्षण विभागाचे उपसचिव यांचा समावेश आहे. एक शासकीय अधिकारी आदिवासींसारख्या दुर्बल घटकाच्या कल्याणाचे कार्य किती प्रभावीपणे करु शकतो ह्याचे आदर्श उदाहरण श्री. सावे ह्यांनी घालून दिले आहे.

श्री. सावे ह्यांचे बोर्डी येथे दिनांक १२ फेब्रुवारी १९८८ रोजी निधन झाले. इ. स. २००९ हे श्री. खंडेराव सावे ह्यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. श्री. खंडेराव सावे ह्यांनी ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या सेवेचे जे कार्य केले ते महाराष्ट्रातील समाज सेवेचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना व अधिकाऱ्यांना प्रेरणा देणारे आहे.

• • •

जंगलजिव्हारच्या निमित्ताने... !

श्री पीतांबर कोडापे

आदिवासी समाजाला वैभवशाली संस्कृतीचा वारसा लाभला आहे. अनेक वर्षे या देशात राज्य करणारा हा समाज ऐतिहासिकदृष्ट्या संपन्न आहे. तंट्या भिल्ल, बिरसा मुंडा, महाराणी दुर्गावती, वीर बाबुराव शेडमाके अशा ऐतिहासिक शूरवीरांच्या या समाजात स्वातंत्र्योत्तर काळात वैचारिक प्रबोधनाची व परिवर्तनाची चळवळ सुरु झाली. साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक अशा विविध अंगानी आदिवासींच्या चळवळी कार्यरत आहेत. प्रबोधन आणि परिवर्तनाचे कार्य करणाऱ्या निष्ठावंत कार्यकत्यांपैकी एक नाव म्हणजे सुनील कुमरे. सुप्रसिध्द विचारवंत प्रा. डॉ. विनायक तुमराम यांच्या संस्काराने घडलेले सामाजिक, साहित्यिक व्यक्तिमत्त्व,वैचारिक चळवळीतील एक खंदा कार्यकर्ता. युवा कवी व विचारवंत, चिंतनशील मनाचा माणूस. आदिवासींच्या वैचारिक प्रबोधनाची सुरुवात झाली ती आदिवासी साहित्याने आणि आदिवासी साहित्याची सुरुवात झाली ती भद्रावती येथे संपन्न झालेल्या दि. १० व ११ नोव्हेंबर १९७९ च्या पहिल्या अ. भा. आदिवासी साहित्य संमेलनाने. आयोजक आणि आदिवासी साहित्य चळवळीचे शिल्पकार प्रा. डॉ. विनायक तुमराम यांच्या अहोरात्र ४० दिवसांच्या अथक परिश्रमाने तो क्षण संस्मरणीय ठरला.



सुनील कुमरे हे नाव नवीन नाही. तिरकमठा च्या रुपाने हे नाव बऱ्याच दिवसापूर्वी प्रकाशझोतात आलेले. अनेक दर्जेदार मासिके, वृत्तपत्रे यातून आदिवासींच्या विविध समस्या व विषयावर त्यांचे लेखन प्रसिद्ध झालेले आहे. तिरकमठा या पहिल्याच काव्यसंग्रहातील अनेक कवितांचा विविध विद्यापीठातील स्नातक व स्नातकोत्तर अभ्यासक्रमात समावेश होणे हे त्यांची अल्पवयातील फार मोठी उपलब्धी. लेखनासोबतच समाजसेवेचे व्रत स्वीकारलेल्या सुनिलने विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रे, परिसंवादासाठी स्वत:ला वैचारिकदृष्ट्या सिद्ध केलेले आहे. हीच त्यांच्या कार्यकर्तृत्वाची मोठी पावती. विविध विद्यापीठस्तरीय आदिवासी साहित्य या विषयावरील त्यांचा सहभाग बरेच काही सांगून जातो.

जंगल जिव्हार हा त्यांचा अलिकडेच प्रकाशित झालेला वैचारिक लेखसंग्रह. गडचिरोली येथे सुप्रसिद्ध विचारवंत-समीक्षक डॉ. वि. स. जोग यांचे हस्ते व

महाकवी सुधाकर गायधनी, विचारवंत डॉ. विनायक तुमराम, प्राचार्य मदन धनकर, कवी नाटककार प्रा. विनोद मोरांडे, आदिवासी नेते वामन जुनघरे यांचे प्रमुख उपस्थितीत या लेखसंग्राहाचे थाटात प्रकाशन झाले. जंगल जिव्हार च्या प्रकाशनानंतर अनेक क्रिया-प्रतिक्रिया उमटल्या. आदिवासी आणि आदिवासेत्तर विचारवंतांनी विविध पातळीवर चिंतन-मंथनही केले. जंगल जिव्हार मध्ये विविध वर्तमानपत्रात पूर्वप्रकाशित १६ लेख १२ परिशिष्टांचा समावेश आहे. या संग्रहाला सुप्रसिद्ध विचारवंत प्रा. डॉ. विनायक तुमराम यांची २४ पृष्ठांची समीक्षणात्मक प्रस्तावना लाभलेली आहे. लेखसंग्रहात चार काव्यपरीक्षणे, दोन चरित्र समीक्षणे, आदिवासी समाजभूषण प्रा. डॉ. विनायक तुमराम यांच्या व्यक्तिमत्वावर व कार्यकर्तृत्वावरील तीन लेखांचा समावेश आहे. याशिवाय आदिवासी समाजाच्या विविध समस्या, वर्तमानकाळातील आव्हाने, जातीय एकात्मता आणि आदिवासी साहित्य अशा आशयांच्या लेखांचा समावेश आहे.

आदिवासी साहित्याचा लेखाजोखा, थोटी/गोंड बुरड/बुरुड, दशा आणि दिशा-एक उपेक्षित प्रवास, आदिवासी जीवन-कला आणि साहित्य. आदिवासींचे वनवासीकरण-वनवासी शब्दाचे भांडवल, आदिवासी जमाती मध्ये सोयर संबंध-कृतीची गरज, गोंडी चळवळ आदिवासी एकसंघतेला अडथळा, गोंड, राजगोंड व तिरकमठा समज आणि गैरसमज या सात लेखांचा सविस्तर परामर्श प्रा. डॉ. विनायक तुमराम यांनी आपल्या २४ पृष्ठांच्या प्रस्तावनेत घेतला आहे.

लेखसंग्रहातील काव्य परीक्षणात सुप्रसिध्द कवयित्री सौ. कुसुम अलाम यांच्या रानआसवांचे तळे या काव्यसंग्रहावर - रानआसवांचे तळे - आदिवासी शोषणाचे वास्तव आणि लढण्याचे शस्त्र या शीर्षकाखाली आणि रानपाखरांची माय या काव्यसंग्रहाचा समावेश आहे.

नंदूरबार येथील चामुलाल राठवा यांच्या 'माझी सनद कुठे आहे ?' या काव्यसंग्रहावरील चामुलाल राठवांची निर्णायक लढ्याची दिशा देणारी कविता या शीर्षकाखाली कवी वसंत कन्नाके यांच्या 'सुक्का सुकुम' या काव्यसंग्रहाची विवेकी समन्वयाचा 'उलगुलान' 'सुक्का सुकुम' या शीर्षकाखालील समीक्षा समाविष्ट आहे. चरित्र समीक्षणात प्रा. डॉ. विनायक तुमराम लिखित आदिवासींच्या अपार दुःखाने कळवळणारा संत या शीर्षकाची 'संत मुंगशुजी एक कृतिशील तपस्वी' या ग्रंथाची व धरतीअबा-जनचेतनेचे विद्रोही रुप या ग्रंथाची सुप्त जनचेतनेचा रुद्र भीषण हुंकार - बिरसा मुंडा या शीर्षकाची समीक्षा समाविष्ट आहे. आदिवासी समाजभूषण, आदिवासी साहित्याचे शिल्पकार प्रख्यात विद्वान प्रा. डॉ. विनायक तुमराम यांच्या सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक कार्यकर्तृत्वाची दखल घेणारे अंधारसारथी - प्रा. डॉ. विनायक तुमराम यांच्या सहवासात. प्रा. डॉ. विनायक तुमराम आणि आदिवासी चळवळ-एक दृष्टीक्षेप या तीन लेखांनी मोलाची भर घातली आहे.

चामुलाल राठवांची कविता

आदिवासी साहित्य चळवळीतील एक सक्रिय सदस्य, संवेदनशील कवी व लढाऊ व्यक्तिमत्व म्हणजे खांडबारा ता. नवापूर, जि. नंदूरबार येथील श्री चामुलाल राठवा. 'माझी सनद कुठे आहे ?' हा राठवांचा काव्यसंग्रह. ११३ पृष्ठांच्या या काव्यसंग्रहाची

समीक्षा सुनिलने 'जंगलजिव्हार' मध्ये केलेली आहे. चामुलाल राठवांची निर्णायक लढ्याची दिशा देणारी कविता हे समीक्षालेखाचे शीर्षक. जंगल जिव्हाराच्या पृष्ठ क्र. ५८ ते ६४ पर्यंत अनेक आशयसंपन्न कवितांची समीक्षा आहे. धरण आणि मरण ही कविता उद्धत केलेली आहे.

जेथे आदिवासी तेथे धरण
तेच आदिवासींचे मरण
जेथे आदिवासी तेथे खाण
झाली आदिवासींची घाण
जेथे आदिवासी तेथे प्रकल्प
हाही त्यांनाच मारण्याचा संकल्प

राठवांच्या कवितांचा परिचय करुन देऊन सुनीलने एका स्वयंसिद्ध कवीचा गौरव केलेला आहे.

सुक्का सुकुम

यवतमाळ येथील एक धडपडणारे आदिवासी व्यक्तिमत्व म्हणजे वसंत कन्नाके. 'सुक्का-सुकुम' हा कन्नाकेचा गाजलेला काव्यसंग्रह. विवेकी समन्वयाचा उलगुलान-सुक्का सुकुम हे समीक्षालेखाचे नाव. सुनिलच्याच शब्दांत सांगायचे झाल्यास कोलामी भाषेतील सुक्का म्हणजे तारे, तर गोंडी भाषेतील सुकुम चा अर्थ तारका, कोलामी आणि गोंड या दोन जमातींच्या भाषिक संमिश्रणातून उगम पावलेला आणि आदिवासी ऐक्याचा आवाज बुलंद करणारा सुक्का सुकुम.

'सुक्का-सुकुम' ची समीक्षा जंगल जिव्हार मध्ये पृ. क्र. ६५ ते ७१ पर्यंत लेखकाने केलेली आहे. सामाजिक विषमतेवर प्रहार करणारी व राष्ट्रीय एकात्मतेचा विचार सांगणारी कन्नाकेंची धर्म ही कविता उद्‌घृत आहे. आदिवासींचा कोणताही प्रस्थापित धर्म नसून केवळ निसर्गवादी धर्म आहे असे या कवितेबद्दल सुनिलला वाटते.

धर्म मशिद धर्म नाही
धर्म नाही स्तूप विहार
कर्मकांड धर्म नाही
धर्म नाही चर्च गुरुद्वार

सुनिलने कन्नाकेंच्या 'मार्ग' या कवितेबद्दलही बरेच काही सांगितले आहे. वर्तमान स्थितीत आदिवासींना गाफील राहून चालणार नाही. सद्‌विवेकाने विचार करुन भविष्याचा वेध घेऊन आदिवासींनी जगावे हा संदेश कवीला या कवितेतून द्यावयाचा आहे. सुनिलने उद्‌घृत केलेल्या ओळी अशा

मार्ग अनेक
त्यातील एक मार्ग
शोधावा लागतो...
कारण काही मार्ग
दिशाहीन चकव्यासारखे
चकविणारे असतात...
म्हणून घासून पुसून
तोलून मापून
पहावे लागते...
निरिक्षण करुनच
पुढचे पाऊल
टाकावे लागते
तेव्हाच कुठे
उद्याचा सूर्य
आपलाच असतो

जंगल जिव्हार मध्ये दोन चरित्रग्रंथांची समीक्षा केली गेली आहे. दोन्ही चरित्रग्रंथांचे सुप्रसिध्द लेखक प्रा. डॉ. विनायक तुमराम हे आहे. आदिवासींच्या अपार दु:खाने कळवळणारा संत-'संत मुंगशुजी एक कृतिशील तपस्वी' या मथळ्याखाली आदिवासी समाजातील एक तपस्वी संत मुंगशुजी महाराज यांच्यावरील चरित्रग्रंथाची समीक्षा करणारा पहिला लेख. आदिवासींमधील उपेक्षित व दुर्लक्षित परंतु समाजजागृतीचे महान कार्य आपल्या भजन-कीर्तन, पोवाड्यातून करणाऱ्या संताचे जीवनचरित्र डॉ. तुमरामांनी आपल्या ओजस्वी लेखणीतून रेखाटले आहे. समीक्षालेखात प्रस्तुत ग्रंथाबद्दल सुनिल म्हणतात, आदिवासी समाजात कलावंतांची वाण नाही. किंबहुना त्यांचे आयुष्यच रानांच्या आणि निसर्गाच्या कलाछटांनी परिपूर्ण आहे. स्वतंत्र अस्तित्वाने, निर्भीड विचाराने जगणाऱ्या आदिवासी समाजाने या भूमीला बरेच काही दिले आहे. त्यापैकी संत मुंगशुजी म्हणजे एक क्रांतिकारी सुधारक. आदिवासींसकट संपूर्ण बहुजन समाजाच्या उत्थानासाठी आयुष्य वेचणारे संत मुंगशुजी हे एक श्रध्देय व्यक्तिमत्व! कदाचित हे नाव बहुतेकांना माहीतच नसावे. असणारही नाही. आदिवासींमधील परधान जमातीत जन्मलेले संत मुंगशुजी आपल्या साहित्य आणि कार्यासहीत आजपर्यंत उपेक्षित राहिले आहेत. त्यांचे वाडमयीन तेज राष्ट्रसंत आणि कर्मयोगी गाडगे महाराज यांच्या तोडीचे होते. परंतु ह्याची दखल घेतो कोण ? आदिवासी म्हणजे अशिक्षित. दऱ्याखोऱ्यात राहणारा रानटी, दुसऱ्यावर अवलंबून राहणारा अशी काही विकृत भावना जनमानसात दिसते. ती अत्यंत चुकीची आहे. त्यामुळे संत मुंगशुजींचा इतिहास उपेक्षित राहिल्यास आश्चर्य कोणते ? परंतु हे सत्य उघडकीस आणले ते प्रा. डॉ. विनायक तुमराम यांनी.

दुसऱ्या चरित्रग्रंथाचे नाव आहे-'धरतीअबा-जनचेतनेचे विद्रोही रुप.' या चरित्रग्रंथाची समीक्षा जंगल जिव्हारच्या लेखकाने 'सुप्त जनचेतनेचा रुद्र भीषण हुंकार-बिरसा मुंडा' या लेखात केली आहे. सदर ग्रंथाचे प्रकाशन मूल नगरीत वाङ्मयपंडीत डॉ. अक्षयकुमार काळेंसारख्या साहित्य क्षेत्रातील दिग्गज कलावंताच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या ग्रंथाच्या मुखपृष्ठ व प्रारंभीच्या मजकुराविषयी सुनिल कुमरे लिहितात- जीवाला जीव देणाऱ्या, स्वातंत्र्याच्या व स्वराज्याच्या उष:कालासाठी प्रतिक्षा करीत लढणाऱ्या बिरसाच्या सर्व धैर्यवान, निष्ठावान व निस्वार्थी क्रांतिकारक सहकाऱ्याना बिरसाईट्सना, अशा आशयाची अर्पण पत्रिका, मुखपृष्ठावरील वेधक शीत-रंगाच्या छटा, डोक्यावर मुंडासे, अंगावर पंचा, हातात दोरखंडाची बेडी असलेल्या आणि चेहऱ्यावरील क्रांतिकारकाचे भाव प्रकटलेले व्यक्तिचित्र, चंद्रशेखर आझादांची आठवण करुन देण्यास पुरेसे ठरते. पुढील पृष्ठावरील पाश्चात्य विद्वान बिल बर्न बॅचचे विधान समाजातील दबलेल्या, पिचलेल्या समाज कार्यकर्त्याला चेतना देणारे आणि दिशादर्शक व मनोबल वाढविणारे आहे. त्याच पानावरील नुर मुहम्मद शायराचा शेर असा-

वो नादिम हुए उसे कत्ल करने के बाद !

मिली जिंदगी उसे उसके मरने के बाद !!

या चरित्रग्रंथाचा मूळ उद्देश सुनीलने प्रतिपादित केला आहे. केवळ भाषण, लेखन व वाचन पुरेसे

नसून बिरसाची विचारधारा आत्मसात करुन तसे आचरण व कृती महत्त्वाची आहे. बिरसा धरम, बिरसा सांगणे सोपे, जगणे कठीण, इत्यादी प्रकरणाबद्दल सुनील लिहितात, चरित्रकाराने बिरसाच्या व्यक्तिमत्वाचे चित्रण अत्यंत साधे व सुटसुटीतपणे केले आहे. पुस्तक वाचताना उलगुलानातील संघर्षाची गंभीरता वाचकांच्या गळी उतरविण्यास लेखक यशस्वी झाले आहे हे मान्य करावे लागेल. बिरसाच्या वैचारिक आंदोलनाची विद्रोही सूत्रे बिरसाच्या आंदोलनाची वैचारिक बैठक मांडायला पुरेशी आहेत. बिरसा, ख्रिश्चन व हिंदू धर्माचा कडवा विरोधक होता. बिरसाने धार्मिक क्रांती देखील केली. बिरसा धरम ची तत्वधारा अत्यंत प्रभावीपणे लेखक नमूद करतात. बिरसाचे उलगुलान कशासाठी होते ? हे मुद्देसूदपणे व सहजरित्या वाचकांच्या लक्षात येते. 'बिरसा व त्याचे आंदोलन-काही प्रतिक्रिया' या प्रकरणात बिरसाच्या चारित्र्याला संदर्भ देऊन हे प्रमाणित केले आहे. सत्य आणि वास्तव यांचे दर्शन लेखकाला सप्रमाण घडवायचे आहे.

सुप्रसिध्द विचारवंत प्रा. डॉ. विनायक तुमराम यांच्याविषयी

'जंगल जिव्हार' चे लेखक स्वत: आदिवासी साहित्य, सामाजिक व वैचारिक चळवळीतले हाडाचे कार्यकर्ते. प्रा. डॉ. विनायक तुमराम यांच्या तालमीत वाढले. रमले. त्यांच्या संस्कारातून घडले. डॉ. तुमराम हे कुमरे यांना गुरुतुल्य आहेत. डॉ. तुमरामांनी स्वत: अथक बौद्धिक परिश्रम घेऊन अनेक कार्यकर्ते घडविले. घडविलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांपैकी सुनील कुमरे हे एक नाव. साहजिकच डॉ. तुमरामांबद्दल सुनीलच्या मनात कृतज्ञतेची भावना आहे. ही कृतज्ञता त्यांनी दोन लेखातून व्यक्त केली आहे. पहिला लेख 'अंधारसारथी - प्रा. डॉ. विनायक तुमराम' व दुसरा लेख 'प्रा. डॉ. विनायक तुमरामांच्या सहवासात.' हा लेख डॉ. तुमराम यांच्या गौरवार्थ आहे. दि. ५ सप्टेंबर २००५ रोजी नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात तत्कालीन राष्ट्रपती महामहीम डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे हस्ते डॉ. तुमरामांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या सुखद व आनंददायी, दुर्मिळ सोहळ्यास सुनीलसह मलाही उपस्थित राहण्याचे सौभाग्य लाभले. या लेखात सुनिल लिहितात.

आदिवासींच्या कर्तृत्ववान नेत्यांनी चळवळीचा वसा इथपर्यंत आणला. त्यांचे समर्थ वाहक होऊन प्रवास करण्याची अगम्य इच्छा त्यांची आहे. आदिवासी साहित्य आणि समाजोद्धाराच्या चळवळीचे कार्य स्वत:च्या सामर्थ्यावर उभारणारे ते नेते आहेत. ५-६ लाख रुपयांचा दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह, विविध लेख, वृत्तपत्रीय कात्रणे, ऐतिहासिक नाणी, कलावस्तू आणि कार्यकर्त्यांची रेलचेल यांनी त्यांचे घर कसे सदा गजबजलेले असते. आज महाराष्ट्रात शेकडो तरुण अभ्यासक आदिवासी साहित्यावर पीएच.डी करीत आहेत. त्या सर्वांचे मार्गदर्शक जरी वेगवेगळे प्राध्यापक असले तरी त्यांना डॉ. विनायक तुमराम यांच्याकडे संदर्भ साहित्य आणि मार्गदर्शन घेतल्याशिवाय पुढे सरकता येत नाही. एवढी अधिकारावाणी त्यांनी महाराष्ट्रात निर्माण केली आहे. एकंदरीत, आदिवासी जीवनाचे चालतेबोलते विद्यापीठ म्हणजे डॉ. विनायक तुमराम. डॉ. तुमरामांच्या गौरवार्थ

पुढे लिहिताना सुनिल कुमरे म्हणतात. केवळ आदिवासी साहित्यच नव्हे तर संत साहित्याचेही ते गाढे अभ्यासक आहेत. धर्म, विज्ञान, अध्यात्म, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र याविषयी देखील त्यांना रुची आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कर्मयोगी गाडगेबाबा यांच्यावरील त्यांची भाषणे ही नेहमी कुतुहलाचा विषय असतो. जैन, बौद्ध, मुस्लिम, ख्रिस्त धर्माविषयी त्यांनी अनेक व्याख्याने दिली आहेत. अमोघ वक्तृत्वशैली आणि सूक्ष्म तपशीलासह विषयामध्ये शिरण्याच्या हातोटीमुळे ते असमान्य प्रतिभावंत आहेत, याची साक्ष आपणास पटते. त्यांच्या कित्येक लेख, भाषणे, बैठका आणि कार्यक्रमाचा मी प्रत्यक्षदर्शी आणि संयोजक आहे. त्यांच्या साहित्यकृतीचा आणि जीवनपटाचा अप्रत्यक्षपणे मी संकलनकर्ता आहे. प्रत्येक मंचावर त्यांनी अमीट छाप सोडली आहे. केवळ कार्य करण्यापेक्षा समाज बदलाचे भान ठेवून वैचारिक आंदोलन उभारून समाज बदल घडवून आणावा या दिशेने त्यांचे कार्य सुरु आहे. आधुनिक जगात आदिवासी समाजाने आपल्या सांस्कृतिक मूल्यांसह ताठ मानेने जगायला शिकले पाहिजे. या दृढ निश्चयाने ते मार्गक्रमण करीत आहेत.

डॉ. विनायक तुमराम यांनी महाराष्ट्रात आदिवासींची वैचारिक, साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक चळवळ चालविलेली आहे. त्याबद्दल लिहिणे सुनीलला क्रमप्राप्त ठरले. कारण हे वैचारिक आंदोलन एवढे सोपे नव्हते. म्हणूनच 'प्रा. डॉ. विनायक तुमराम आणि आदिवासी चळवळ-एक दृष्टीक्षेप' हा अभ्यासपूर्ण व महत्त्वाचा लेख सुनीलने जंगल जिव्हारच्या पृष्ठ क्रमांक ११९ ते १२५ पर्यंत बौद्धिक परिश्रम घेऊन पूर्ण केला आहे. कोणतीही वैचारिक व बौद्धिक चळवळ उभारुन पूर्णत्वास नेणे सहजासहजी सोपे नसते. अनेक चळवळी उभ्या होतात; पण अर्धवट राहतात. मध्येच कुठेतरी संपतात. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी यशस्वी होण्यास बराच वेळ लागतो. पिढ्यान्‌पिढ्या खर्ची पडतात. उभे आयुष्य त्यासाठी वेचावे लागते.

डॉ. तुमराम यांनी आदिवासी साहित्य हे कोणत्याही साहित्याची प्रतिकृती नसून स्वतंत्र व स्वयंभू आहे हे निक्षून सांगितले आहे. त्यांनी आदिवासी धर्म, आदिवासी कायदा व आदिवासींचा स्वतंत्र राजकीय पक्ष या त्रिसूत्रीवर भर देऊन त्यादृष्टीने पावले उचलली आहेत. याबाबत प्रस्तुत लेखात सुनील कुमरे म्हणतात. आदिवासींमध्ये अनेक जमाती आहेत. या जातीय संरचनेबरोबर भिन्न भाषा, भिन्न प्रादेशिकता, भिन्न संस्कृतीचा पीळ त्या त्या जमातींना चिकटला आहे. परंतु या सर्वांना बांधणारा एक धागा आहे तो म्हणजे आदिवासी धर्म. आदिवासींमधील ज्या प्रमुख जमाती आहेत. त्यापैकी गोंड, परधान, भिल्ल, महादेव कोळी, मिना, संथाल, नागा, खासी, मुंडा या जमाती होत. भारतातल्या या प्रमुख जमातींच्या निसर्गवादी तत्वाचे अध्ययन करुन सर्वांना पचेल असा सर्वसामाईक आदिवासी मूळ धर्म जो निसर्गवादी असेल, अंधश्रध्दांना बळी पडणारा नसेल अशा मूळ आदिवासी धर्माचे पुनरुज्जीवन करण्याची नितांत गरज आहे. अशा आदिवासी धर्मांचा दीक्षांत सोहळा घ्यावा. त्या त्या जमातीच्या प्रमुख धर्म अभ्यासकांनी आणि विचारवंतांनी आदिवासी धर्मसंसद निर्माण करावी जेणेकरुन त्या त्या जमातीच्या धर्माचे प्रतिबिंब त्या

मूळ आदिवासी धर्मात दिसू शकेल. 'आदिवासी कायदा' या डॉ. तुमरामांच्या संकल्पनेबद्दल सुनील लिहितात आदिवासी कायदा या विषयावर देखील त्यांचे लेखन सुरु आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ एम.एस.डब्ल्यू. भाग २ आदिवासी जीवनातील रूढी, परंपरा, नियम व कायदे एक अध्ययन (विशेष संदर्भ - गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील माडीया जमात) २००४-०५ या विषयावर लघुनिबंध सादर करुन आदिवासी पंचायती व न्यायदान पध्दतीचा अभ्यास त्यांनी केला. एल.एल.एम. च्या द्वितीय वर्षाकरीता देखील आदिवासी कायदा (Tribal Law) हाच विषय त्यांनी निश्चित केलेला आहे. असे त्यांच्या चर्चेवरुन समजले. तसेच एल.एल.डी. करीता आदिवासी धर्म व कायदा या विषयावर आपले अध्ययन पूर्ण झालेले असून केवळ औपचारिकता शिल्लक राहिलेली आहे असे त्यांनी चर्चेतून सांगितले. दिनांक २४/५/२००८ ला दिल्ली येथे राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यास मी आणि पितांबर कोडापे त्यांचेसोबत होतो. पुरस्कार वितरण सोहळ्यानंतर दिल्लीतील पुस्तक विक्रेत्यांकडे तीन दिवस पुस्तके खरेदीकरीता गेलो. आदिवासी धर्म आणि कायद्यावरील जवळपास ८ ते १० हजार रुपयांची पुस्तके त्यांनी खरेदी केली. संथाल, खासी, नागा यांच्या धर्मविषयक आणि कायद्याविषयक इंग्रजीतील ग्रंथसंपदा त्यांनी मिळविली. जंगल जिव्हार मध्ये काही परिशिष्टे जोडलेली आहेत. प्रस्तुत परिशिष्टे म्हणजे वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेले लघुलेख आहेत.

आदिवासी विद्यापीठ

अलिकडे चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यात गोंडवाना विद्यापीठाच्या निर्मितीबाबत जोरदार चर्चा सुरु आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे उपकेंद्र गडचिरोली येथे आधीच कार्यरत आहे. डॉ. तुमरामांनी मागील कित्येक वर्षापासून विविध पत्रकार परिषदा, वृत्तपत्रातील लेखन, सभा संमेलनातील भाषणांतून सतत आदिवासी विद्यापीठाबद्दल मागणी करुन पाठपुरावा केलेला आहे. ते स्वत: नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य राहिले आहेत. आदिवासी विद्यापीठाची गरज व त्याचे महत्व त्यांनी शासनाला विविध माध्यमातून पटवून दिले. त्याचीच ही फलश्रुती म्हणजे भविष्यकाळात होऊ घातलेले गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठ व सध्या कार्यरत विद्यापीठाचे उपकेंद्र याबाबत सुनिल लिहितात. आदिवासींची सांस्कृतिक, ऐतिहासिक, कलात्मक, ज्ञानात्मकदृष्ट्या संपन्न तसेच अभ्यासू आणि आत्मनिर्भर होण्यासाठी आदिवासी विद्यापीठ काळाची गरज आहे. महाराष्ट्रातील गोंडवाना, सह्याद्री, सातपुडा या तिन्ही विकासगटात स्वतंत्र आदिवासी विद्यापीठ त्या त्या विभागालगतच्या आदिवासी जमातीचा सर्वंकष अभ्यास आणि विकास होण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. या लेखात एका कवीच्या ओळी उद्घृत आहेत.

इथे मागून काही मिळत नसते
सर्व काही मिळवून घ्यावे लागते
आयुष्याला मुठभर माती देऊन

याशिवाय डॉ. विनायक तुमराम यांना विविध स्तरावरील प्राप्त पुरस्कार आणि त्यांच्या साहित्याचा विविध विद्यापीठातील अभ्यासक्रमात समावेश झाल्याबद्दल आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल डॉ.

विनायक तुमराम यांचे अभिनंदन या लघुलेखात परामर्श घेतला आहे.

पाठ्यपुस्तकात भिल्लांविषयी गैरसमज

या लघुलेखात सुनिल कुमरे यांनी एका अर्थाने म. रा. मराठी पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाचा निषेधच नोंदविला आहे. आदिवासी भिल्ल समाजाबद्दल विकृत शब्द वापरल्याबद्दल त्याने या लेखात तक्रार नोंदविली आहे. इयत्ता ४ थीच्या बालभारती पुस्तकात पाठ १४, देवी अहिल्याबाई होळकर या पाठात भिल्लांबद्दल जे शब्दप्रयोग आहेत ते निषेधार्ह आहेत. त्यासाठी लेखकाने अनेक ऐतिहासिक पुरावे सादर केलेले आहेत. या लेखात ते म्हणतात.

देवी अहिल्याबाई होळकर यांची कारकीर्द १८ व्या शतकातील, सदर कालखंडाचा विचार केल्यास इ. स. १७८० ते १८०० च्या कालखंडात भिल्लांनी अनेक ठिकाणी बंडाळी केल्याचे आढळते. त्याचे कारण शिंदे, होळकर, गायकवाड आणि पेशवे यांनी भिल्लांचा केलेला छळ. होळकरांनी पश्चिम खानदेशावर तीन वेळा हल्ले केले व तेथील भिल्लांचे जीवन अस्थिर व असहाय्य केले. त्यामुळे भिल्ल प्रदेशाचे फार मोठे नुकसान झाले. पुढे सुनिल म्हणतात, सदर ऐतिहासिक पार्श्वभूमीवर भिल्लांची बंडखोरी ही त्यांच्या अस्मिता, आत्मसम्मान, स्वातंत्र्य, स्वराज्य, स्वाभिमान यांचे प्रतिक आहे. या मजकुराचा निषेध करताना सुनिल कुमरे पुढे लिहितात, स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाची बाजी लावणारे शहीद जरी इंग्रजांच्या दृष्टीत राजद्रोही ठरत असले तरी देशाच्या स्मरणात देशभक्त म्हणूनच त्यांची नोंद आहे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यप्रेमी, स्वराज्यासाठी प्राणाची आहुती देणारे भिल्ल चोर, लुटारु, डाके घालणारे ठरुच शकत नाही. पाठ्यपुस्तकातील विवेचन हे सर्वथा विद्यार्थ्यांना भिल्ल जातीविषयी दिशाहिन ज्ञान देणारे, घृणा निर्माण करणारे, भिल्लांचे ऐतिहासिक महत्व कमी करणारे म्हणूनच निषेधात्मक ठरते. सुनिलची ही नाराजी रास्त आहे. भिल्लांसकट सर्व जमातींनी सुनिलचा मुद्दा उचलून शासनाप्रती किती व कशी तक्रार नोंदविली हे महत्त्वाचे आहे.

आजवर आदिवासी साहित्यात वैचारिकतेचा व निर्मितीचा दुष्काळ होता. सुनिलच्या जंगल जिव्हार ने ही वैचारिक टंचाई थोडीशी का होईना कमी केली. त्यासाठी त्याचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. प्रश्न उरतो वाचकांचा. जंगल जिव्हार कडे वाचक व सुशिक्षित आदिवासी समाजाचे तथाकथित साहित्यिक व्यक्तिमत्व कोणत्या नजरेने बघतात हे महत्वाचे आहे. पण क्रिया-प्रतिक्रियांचा विचार न करता सुनिलने आपली लेखनी धाडसाने उचलली हे त्याहीपेक्षा महत्त्वाचे आहे असे मला वाटते. सांसारिक भार, शासकीय सेवा सांभाळून लेखनी झिजविणे इतके सोपे नसते, हे मी स्वानुभावातून सांगू शकतो. सुनिलच्या या वैचारिक परिवर्तनाच्या प्रवासातला मीही एक सोबती आहे. उत्तम बांधणी, आकर्षक मुखपृष्ठ व सुबक छपाई ही जंगल जिव्हारची महत्त्वाची वैशिष्ट्ये. त्याच्या भावी वाटचालीला माझ्या शतशः शुभेच्छा.

'जंगल जिव्हार' - लेखक : सुनिल कुमरे प्रकाशक : सुनील कुमरे, बल्लारपूर, चंद्रपूर

प्रथमावृत्ती - १ ऑगस्ट २००९. मूल्य रु. १५०/-

● ● ●

boIUrÀ`m Vbodmar

डॉ. प्रतिभा वाघमारे

'लेखणीच्या तलवारी' उषाकिरण आत्राम यांचे सहावे पुस्तक वेगवेगळ्या स्तरावरुन होणाऱ्या शोषणाची व्यथा मांडताना त्यावर सहज उपाय शोधणारी त्यांची कविता आहे. आपल्या अस्तित्वाचा लढा आपणच लढला पाहिजे. असा प्रचंड आशावाद त्यांच्या कवितेत आहे. सामाजिक परिवर्तनासाठी कविता, झाडीबोली कविता आणि इतर विषयांवरील गीतांमध्ये विभाजित एकूण अठ्ठावन्न कविता या काव्यसंग्रहात समाविष्ठ आहेत.

''आवं माये ! नशिब नशिब म्हणू नोको !
नशिबतं आपल्याच हाती आहे !
नशिबाले दोस देत
लुळी पांगळी करतो आम्ही जिनगी''

परंपरागत रुढीच्या भोव-यात अडकलेले स्त्रीमन आपल्या दु:खाला नशिबाच्या कोंदणात बंद करुन आजपर्यंत आपले स्वातंत्र्य नाकारीत आलेली आहे. परंतु शिक्षणामुळे नव्या पिढीला यशाचा मार्ग स्वत:च्या सामर्थ्याने खेचून आणता येतो, हे सत्य उमगलेले आहे.

'आपली लढाई लढली पाहिजे
नाही तर आपलेच रक्त सांडविण्याचा
आपणास काय अधिकार !'

कर्तव्य आणि अधिकार यांचा सुसंवाद आज नामशेष होताना दिसतो आहे. त्यामुळे जिकडे-तिकडे विवकेशून्य, कर्तव्यशून्य, सामर्थ्यशून्य, माणुसकी हरविलेल्या व्यक्तीमत्वाचा गुणगौरव करण्याची परंपरा रुढ होत आहे. याची बोच कवियित्रीच्या ह्रदयाला हेलावून सोडणारी आहे. त्यामुळेच त्यांची कविता शोषणमुक्तीच्या लढ्यात सजगपणे लढण्याची भाषा बोलताना दिसते.

त्या बापाचे बोल दिशा दाखवत आहे
तरी अंधारात चाचपडता ?

दिशादर्शक विचारमार्ग सोबतीला असताना फक्त एकजुटीच्या अभावाने होणारे फरफट व्यक्त करणारी 'तुमचा मेंदू धुवून काढा' ही कविता आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडते.

'दुनिया जलमाले घालनारी - बाय कमी कशी !'

बाई शिकलेली, अशिक्षित, ग्रामीण शहरी कुठल्याही, स्तरातील असू दे. बाईकडे बघण्याचा सामाजिक सांस्कृतिक पुरुषी दृष्टीकोनाला कवयित्री विज्ञानवादातून निरुत्तर करणारे सडेतोड उत्तर देताना दिसते.

बापा ! खरंच आपला देश आहे काय ?
खरंच आपण स्वतंत्र आहोत काय ?

असा प्रश्न विचारणारी कवयित्री, लोकशाही प्रणालीच्या देशात आपणास चिंतनशील बनविते. 'आत्मचिंतन' 'मरण स्वस्त होत आहे', 'बाताल मावा देश ?', 'गिनती', 'जय विचार करा', 'मि उभी रानात', इत्यादी कवितेत नक्षलवादाच्या विकृत रुपाने चहुबाजूने आदिवासीचे होणारे शारीरिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक शोषणाची

एक परंपरा निर्माण केली जात आहे. निसर्गाच्या सानिध्यात स्वच्छंद विहार करणारा आदिवासी समाजबांधवाचे स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी आदिवासी पूर्व-इतिहायाचे शौर्य दाखले उजागर करुन उषाकिरण आत्राम यांची कविता 'लढे' उभारण्यास आवाहन करते.

सर्वसामान्य माणूस मोठ्या ओशेने वर्दीतल्या माणसात माणूसकी शोधत असतो. परंतु त्यांच्याकडूनच अन्यायकारक वर्तणुक मनात खिन्नता प्रदान करुन जाते.

'जरा शरम करा ....,' 'महा काही चुकल का ?' या कवितेतून व्यक्त झालेली आहे.

मित्रा ! आपले कुपोषण भूकबळी आणि मृत्युही
त्यांच्या थेट्ट्रेचा विषय झाला ... !
आपला विकास उत्यानाची जाहिरात करुन
ते कागदी महाल उभारतात ...
आम्हास बंदर भालू बनवून नाचवतात ...
त्यांचा ढोल गजबजतो दिल्लीतून - गल्लीपर्यन्त
विकास ! विकास ! आदिवासीचा विकास !

आदिवासी विकासाच्या नावाखाली होणारी कागदी तडजोडी आणि आदिवासी विकास यातील मन सुन्न करणारे वास्तव चित्रण उभी करणारी कविता आहे.

तो आमची भूक जाने
म्हनोन तेले देव माने
म्हणून आमचा देव मोहावर
ते आमचं देवजाडं ।

उषाकिरण आत्राम आदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व करणारी कवयित्री आहे. त्यामुळेच त्यांच्या काव्यात आदिवासी संस्कृतीतील छोट्या-मोठ्या गोष्टीचा सहज शिरकाव झालेला आहे. आंबा, साग, पळस इत्यादीचे महत्व आदिवासी संस्कृतीत जसे आहे तसेच मोहाच्या झाडाला देवझाड म्हणून निसर्गावर प्रेम करणारी एक सहज प्रवृत्ती आदिवासी माणूस जपतो आहे.

मी आहे दरीखोरीत
फुलणाऱ्या लाल पळसाची आग
किंवा
भर उन्हात परस लवलवते उनात
असीच तू बी, फूल परसावानी

प्रखर उन्हाचे चटके सहन करीत फुलणारा पळस आणि प्रत्येक आघाडीवर दु:खाच्या वेदना भेदून चिवटपणे जगण्याचा मार्ग शोधून काढणारी स्त्री अशा प्रकारे पळस आणि स्त्रीजीवन यांचा तुलनात्मक विचार उषाकिरण आत्राम यांनी आपल्या काव्यातून मांडला आहे.

पाण्यात वान पाये माह्य बहिनी
आमचा आयना चिखुलपाणी
कोठ कोडला आरसा कोठली फणी
आमचा आरसा चिखुलपाणी ।

निसर्ग सानिध्यात चिखलपाण्यात आरसा शोधणारी बाह्य सौदर्यापेक्षा आंतरमनातील सुंदरतेला प्राधान्य देणारी स्त्रीभावना व्यक्त होणारी कविता.

शंकरपट, सागाचे बन, चिन्नुरभात, रोवणा, इत्यादी शब्दाचा काव्यातून केलेला वापर आणि झाडीपट्टीतील संस्कृतीचे चित्रण त्यांच्या कवितेत दिसते. एवढेच नाही तर ग्रामीण, आदिवासी नव्हे संपूर्ण स्त्री जीवनाशी निगडीत सुख-दु:खे उषाकिरण आत्राम यांच्या कवितेचे विषय झालेले आहेत.

सावित्रीच्या आम्ही लेकी
साऱ्या मिळुनि करु ग एकी
ज्ञानाची ही मशाल घेऊनी
पुढे पुढे ग जाऊ
उजेड परत जाऊ
आम्ही आमचं जीणं होऊ

स्त्रियांना दुय्यम स्थान देऊन नाकारण्यात आलेल्या जगण्याचे नवे संदर्भ निर्माण करण्याची क्षमता आमच्यात आहे. अशा प्रचंड आशावादाची उर्जा उषाकिरण आत्राम यांच्या कवितेत आहे.

उषाकिरण आत्राम यांच्या काव्यात बरेचदा त्याच त्या प्रतिमा आणि विषयाचा सारखेपणा अनुभवायला येतो. परंतु शब्द लालित्यापेक्षा वास्तवाचे भान जपणारी, कधी झाडीबोली, कधी गोंडी शब्दछटा घेऊन व्यक्त होणारी भावना, निसर्गात आत्मसमर्पित होऊन मानवमुक्तीची धग होऊ बघणारी त्यांची कविता आहे. सामाजिक परिवर्तनासाठी जागर करणारी, नव्या दिशांना कवेत घेऊन आंदोलनाच्या तयारीसाठी लेखणीच्या तलवारीच्या रुपाने वाचकाच्या मनात रुतून बसणारी उषाकिरण आत्राम यांची कविता आहे.

• • •

(पान क्र. ७ वरुन)

जीवन व्यापक, विस्तृत व क्रियाशील करणारे माध्यम बनावे अशी माझी त्याबद्दलची कल्पना आहे. या उद्देशानेच अनेक मित्रांशी, विचारवंतांशी, विद्वानांशी चर्चा करीत या मंडळाचा जन्म झाला आहे. अशा प्रकारच्या साधनाची, माध्यमाची आवश्यकता होती. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपूर्वी अनेक दिवस अशा तऱ्हेचा विचार, अशा तऱ्हेची कल्पना माझ्या मनात घोळत होती. आता ती कल्पना साकार होत आहे.

या मंडळाचे अध्यक्षस्थान माझे मित्र आणि ज्येष्ठ विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्वीकारले याबद्दल मला अतिशय आनंद होत आहे. तो व्यक्त करण्यास माझ्याजवळचे शब्द अपुरे पडतात. ते अशा पदापासून दूर राहाणारे आहेत. त्यांच्या माझ्या केवळ घरोब्याच्या आणि प्रेमाच्या संबंधामुळे मी त्यांना येथे पकडून आणण्याचा प्रयत्न केला आणि त्यांनी ही जबाबदारी स्वीकारण्याचे कबूल केले. त्याबद्दल त्यांचे प्रथम मला आभार मानले पाहिजेत. त्यांच्यावर अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्याा आहेत. असे असूनही त्यांनी ही नवीन जबाबदारी स्वीकारली. त्यांच्या वाई येथील प्राज्ञपाठशाळेत धर्मकोश तयार करण्याची जबाबदारी त्यांनी गुरुप्रेमासाठी स्वीकारली. मी त्यांना असे म्हणेन की, या गुरुप्रेमाच्या स्वरुपाचेच, मराठी भाषेचे, मराठी जनतेचे हे जे ऋण आहे, ते परतफेडीचे ऋण आहे. हे कार्य ते करतील अशी माझी खात्री आहे. सरतेशेवटी, ही नवी संस्था सारखी वाढती राहो, आणि साहित्यिकांच्या या महान यात्रेत, संस्कृतीचा आणि ***स्वाधीन*** साहित्याचा जरीपटका खांद्यावर घेऊन ही संस्था ***यशश्रीच्या*** सतत आघाडीवर राहो अशी सदिच्छा व्यक्त करुन मी या मंडळाचे उद्घाटन झाले असे जाहीर करतो.

• • •